


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३०० ■ रविवार, दि. १० मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# लोकांच्या पैशाला हात लावणार नाही – विजय

प्रतिनिधी १० मे

## ◆ तामिळनाडूच्या मुख्यमंत्री पदाची शपथ ◆ मंचावर केल्या तीन फाईल्स क्लिअर

**चेन्नई :** आज विजय यांनी तामिळनाडूच्या नव्या मुख्यमंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारला. यावेळी त्यांच्यासोबत ९ मंत्रीही सहभागी झाले होते. आनंद, आधव अर्जुन, सेंगोत्तैयन, सीटीआर निर्मलकुमार, डी.के. प्रभू, कीर्तना, अरुणराज, व्यंकट रामनन, राजमोहन यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर त्यांनी मंचावर २०० युनिट वीज, महिला सुरक्षा आणि अमली पदार्थ प्रतिबंधाशी संबंधित ३ महत्त्वाच्या फायलींवर स्वाक्षरी केली.

मी लोकांच्या पैशाला हात लावणार नाही. मला त्याची गरज नाही. हा विजय कोणतीही चूक करणार नाही. तो कोणालाही चूक करू देणार नाही. मग ती व्यक्ती कोणीही असो. जे माझ्यासोबत आहेत, त्यांनाही मी माझ्या सरकारमध्ये स्थान देणार नाही.

यानंतर विजय लोकांशी बोलला आणि म्हणाला, 'मी एका सहाय्यक दिग्दर्शकाचा मुलगा आहे, ज्याने कठोर परिश्रम करून सिनेमा क्षेत्रात यशस्वी होण्याचा प्रयत्न केला. गरिबी आणि भूक म्हणजे काय हे मला चांगलेच ठाऊक आहे. मी राजघराण्यातील नाही. मी तुमच्याच घराण्यातील आहे. मला असेच वाटते. तुम्हीसुद्धा माझ्याबद्दल असाच विचार केला, म्हणूनच तुम्ही मला सिनेमात मोठे स्थान दिले.' मी काही देवदूत नाही. मी एक सामान्य जीवन जगतो. मी हे किंवा ते करीन अशी खोटी आश्वासने देणार नाही. जे माझ्या आवाक्यात आहे, तेवढेच मी करीन. मला तुम्हाला आणखी एक गोष्ट सांगायची आहे, ती म्हणजे तामिळनाडू सरकारची परिस्थिती. त्यांनी तिजोरी पूर्णपणे रिकामी ठेवली आहे. अशा परिस्थितीतच थवेका सरकारने पदभार स्वीकारला आहे. मी तामिळनाडू सरकारच्या परिस्थितीवर एक श्वेतपत्रिका प्रसिद्ध करीन. मी जे काही सांगितले आहे, त्या सर्वांची मी हळूहळू अंमलबजावणी करीन. फक्त मला थोडा वेळ द्या. हे तुमचे राज्य आहे,' असे ते म्हणाले.



### त्रिशाला शाही सन्मान !

तामिळनाडूचे नवे मुख्यमंत्री म्हणून विजय यांच्या शपथविधी सोहळ्याला अभिनेत्री त्रिशा उपस्थित असल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. अभिनेत्री त्रिशानेही विजयच्या मुख्यमंत्रीपदाच्या शपथविधी सोहळ्यात भाग घेतला आहे. विजय आणि त्रिशा यांच्याबद्दल आधीच वाद सुरू असताना, तिने या शपथविधी सोहळ्याला हजेरी लावली आहे. या कार्यक्रमाला आलेल्या अनेकांनी त्रिशासोबत सेल्फी काढण्याचा आनंद लुटला. त्रिशाला पहिल्या रांगेत जागा देण्यात आली आहे. या सर्व समस्यांच्या पार्श्वभूमीवर त्रिशाचा सहभाग सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनला आहे.

### मुख्यमंत्र्यांनी मंचावर केली सही

तामिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारलेल्या त्याच मंचावर विजय यांनी मोफत वीज आणि बस सुविधांशी संबंधित फाईल्सवर पहिली स्वाक्षरी केली आहे. चेन्नई येथील नेहरू इनडोअर स्टेडियममध्ये पदभार स्वीकारल्यानंतर लगेचच विजय यांनी तीन महत्त्वाच्या फायलींवर स्वाक्षरी केली. त्यामध्ये २०० युनिटपर्यंत मोफत वीज, महिलांच्या सुरक्षेसाठी सिन्हा महिला विशेष दल आणि प्रत्येक जिल्ह्यात अमली पदार्थ प्रतिबंधक उपक्रमांचा समावेश आहे . मुख्यमंत्री म्हणून विजय यांनी तीन महत्त्वाच्या फायलींवर स्वाक्षरी केली आहे. तामिळनाडूमध्ये घरगुती वापरासाठी पहिल्या १०० युनिट्सवर आधीपासूनच कोणतेही शुल्क आकारले जात नाही. मोफत विजेची ही संख्या आता २०० युनिट्सपर्यंत वाढवण्यात आली आहे. जिल्ह्यांमध्ये अमली पदार्थ प्रतिबंधक युनिट्स स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत.





CLASSIFIED

**पाहिजे**

पार्ट टाईम अँड फुल टाईम जॉब करीता मुले पाहिजेत...!
१) मार्केटिंगसाठी ३ मुले
(२ व्हिलर, आणि मोबाईल आवश्यक) वेळ ९ ते ५
२) माल पोहचवायला २ मुले
-:संपर्क:-
**आदिराज इंटरप्रासेस**
प्लॉट नं. ५०७
नमुना गल्ली नं.४
राजकमल चौक,अमरावती
मो. 7028286766

# अशोक खरात प्रकरणात 4 मंत्र्यांचा थेट सहभाग

## माहिती मिळाल्यावर खरातला मारून टाकतील, कॉंग्रेस नेते नाना पटोलेंचा खळबळजनक दावा

प्रतिनिधी १० मे



**मुंबई:** नाशिकच्या भोंदू अशोक खरात प्रकरणी कॉंग्रेस नेते नाना पटोले यांनी राज्यातील चार मंत्र्यांचा या प्रकरणात थेट सहभाग असल्याचा खळबळजनक दावा करत प्रकरणाला नवे वळण दिले आहे. अंधश्रद्धेच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी खरातला आधीच अटक करण्यात आली असून, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने विशेष तपास पथकाची नियुक्ती केली आहे. या प्रकरणातील काही आक्षेपार्ह व्हिडिओ समोर आल्यानंतर राज्यात मोठी चर्चा झाली होती, मात्र आता पटोले यांनी थेट सत्ताधारी मंत्र्यांवरच निशाणा साधल्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. नाना पटोले म्हणाले की, अशोक खरातकडून सगळी माहिती गोळा केल्यानंतर त्याला मारून टाकले जाईल. विधानसभेतही बोललो. या खरात प्रकरणात महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील ४ मंत्र्यांचा समावेश आहे.




# विकास लवांडे यांच्यावर शाईफेक प्रकरण

प्रतिनिधी १० मे

## ◆ कीर्तनकार संग्राम भंडारेसह १२ जणांवर गुन्हा

**पुणे :** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर कीर्तनकार संग्राम भंडारे यांच्यासह त्यांच्या समर्थकांनी शाईफेक केल्याचा प्रकार शनिवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास म्हातोबाची आळंदी (ता. हवेली) येथे घडली. वारकरी संप्रदायाबाबत केलेल्या वक्तव्यावरून हा प्रकार घडला असल्याचे समोर आले आहे. दरम्यान, या घटनेनंतर विकास लवांडे यांनी लोणीकाळभोर पोलिस ठाणे गाठले. मात्र, अपेक्षित असा प्रतिसाद न मिळाल्याने लवांडे यांच्यासह कार्यकर्त्यांनी ठिय्या आंदोलन केले. त्यानंतर कीर्तनकार संग्राम भंडारे, अक्षय कांचन यांच्यासह दहा ते बारा जणांविरोधात भारतीय न्यायसंहिता कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेली माहिती अशी की, काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी वारकरी संप्रदायामध्ये अलीकडे घुसखोरी वाढली असल्याचा गंभीर आरोप केला होता. तोच धागा पकडत पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी थेट वारकरी संप्रदायातील २० जणांची नावे घेतली होती. यावरून लवांडे यांच्यावर टीकेची झोडही उठली होती.

# खरात प्रकरणात रुपाली चाकणकर आज एसआयटीसमोर हजर राहणार !

प्रतिनिधी १० मे

**पुणे :** नाशिकमधील भोंदू अशोक खरात प्रकरणात राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर आज एसआयटीसमोर हजर राहणार आहेत. यासाठी आज सकाळी पुण्याहून नाशिकसाठी रुपाली चाकणकर रवाना झाल्या.



नाशिकच्या गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण महाविद्यालयात रूपाली चाकणकर चौकशी केली जाणार असल्याची माहिती आहे. एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते स्वतः रूपाली चाकणकर यांची चौकशी करण्याची शक्यता आहे. रुपाली चाकणकर यांच्यासोबत महिला वकील उपस्थित राहणार आहेत. रूपाली चाकणकर यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षपदावर असताना पदाचा गैरवापर केल्याचा ठपका आहे. गेल्या काही दिवसांपासून अशोक खरात प्रकरणी अनेक धक्कादायक माहिती समोर येत आहे. तसेच सदर प्रकरणी आतापर्यंत अनेक लोकांची एसआयटी आणि पोलिसांकडून चौकशी करण्यात आली. त्यानंतर आता रुपाली चाकणकरांचीही अशोक खरात प्रकरणात चौकशी होणार आहे. दरम्यान, २२ मे पर्यंत अशोक खरातला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. अशोक खरातने स्थापन केलेल्या श्री शिवनिका संस्थेच्या विश्वस्त मंडळावर सलग दोन वेळा सदस्य राहिल्यामुळे रुपाली चाकणकरांच्या भूमिकेवर विविध प्रश्न उपस्थित करण्यात आले. तसेच अशोक खरातचे जाहीर कौतुक करताना, त्याचे पाय धुवतानाचे रुपाली चाकणकरांचे व्हिडीओही समोर आले. यानंतर रुपाली चाकणकरांना महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. काही दिवसांआधी रुपाली चाकणकरांची बहीणीची देखील चौकशी झाली होती. त्यानंतर आज रुपाली चाकणकरांची एसआयटी चौकशी होणार आहे.

# यंदा अंदमानात मान्सूनचे लवकर आगमन !

## ◆ स्कायमेटचा अंदाज; उकाड्यापासून सुटका होणार उत्साह

प्रतिनिधी १० मे



**मुंबई :** राज्यात उन्हाचा तडाखा आणि कोकणात असह्य उकाड्यामुळे नागरिक हैराण झालेले असतानाच एक अत्यंत आनंदाची बातमी समोर आली आहे. यंदा अंदमानात मान्सूनचे आगमन निर्धारित वेळेच्या आधीच होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. 'स्कायमेट' या खासगी हवामान संस्थेच्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्रामुळे मान्सूनला मोठी चालना मिळाली असून तो लवकरच अंदमानात दाखल होईल. हवामान तज्ज्ञांच्या मते, १२ आणि १३ मे दरम्यान विषुववृत्तीय प्रदेशाजवळ आणि बंगालच्या उपसागराच्या दक्षिण-पश्चिम भागात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याची शक्यता आहे. या प्रणालीमुळे विषुववृत्तीय वाऱ्यांचा प्रवाह अधिक मजबूत होईल, परिणामी मान्सून सरासरी तारखेच्या आधीच अंदमानात धडकू शकतो. यापूर्वी मान्सून १४ ते २२ मे दरम्यान येण्याचा अंदाज होता, मात्र आता हे आगमन त्याआधीच होण्याची चिन्हे आहेत. साधारणपणे मान्सून अंदमानात दाखल झाल्यानंतर त्याचा कोकणापर्यंतचा प्रवास २१ दिवसांचा असतो.







सिटी न्यूज सुपरफास्ट च्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !



सिटी न्यूज सुपरफास्ट
विविधा
रविवार, दि. १० मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

**आजच्या काळात मुलांच्या फिटनेसबद्दल जागरूकता वाढत असताना, जिम आणि उंचीबद्दलचे अनेक गैरसमज अजूनही समाजात दिसून येतात. आजही पालकांच्या मनातील मोठा गैरसमज 'लहान वयात जिम केल्याने उंची वाढणं थांबतं' 'वजन उचलल्याने मुलांची वाढ होत नाही' अशा प्रकारचे समज आजही अनेक पालकांच्या मनात खोलवर रुजलेले दिसतात. त्यामुळे अनेकदा मुलांना जिम, खेळ किंवा स्ट्रेंथ ट्रेनिंगपासून दूर ठेवले जाते. पण वैज्ञानिकदृष्ट्या पाहिलं तर हा समज पूर्णपणे चुकीचा आहे.**



# जिम आणि उंची : सत्य आणि गैरसमज




**जिममुळे उंची थांबते का? सरळ आणि स्पष्ट उत्तर – नाही.**

योग्य पद्धतीने आणि प्रशिक्षित मार्गदर्शनाखाली केलेला व्यायाम किंवा जिम ट्रेनिंग मुलांची उंची थांबवत नाही. उलट, तो मुलांच्या एकूण शारीरिक आणि मानसिक विकासासाठी फायदेशीर ठरतो. आज जगभरातील स्पोर्ट्स सायन्स आणि वैद्यकीय संशोधनामध्ये हे स्पष्ट सांगितले जाते की: योग्य व्यायामामुळे ग्रोथ प्लेट्स खराब होत नाहीत नियंत्रित स्ट्रेंथ ट्रेनिंग मुलांसाठी सुरक्षित असू शकते सक्रिय मुलांची वाढ निष्क्रिय जीवनशैली असलेल्या मुलांपेक्षा अधिक चांगली दिसून येते

**मग हा गैरसमज निर्माण कसा झाला? पूर्वी काही लोक चुकीच्या पद्धतीने :**

- अतिजड वजन उचलणे
- चुकीचा फॉर्म वापरणे
- ट्रेनरशिवाय हेवी लिफ्टिंग करणे
- कमी वयात बॉडीबिल्डरसारखी ट्रेनिंग करणे अशा चुका करत होते. त्यामुळे दुखापती होत होत्या आणि त्याचा संबंध 'उंची थांबली' याच्याशी जोडला गेला.

**प्रत्यक्षात समस्या जिम नव्हती :** समस्या होती चुकीची पद्धत आणि अयोग्य मार्गदर्शन. मुलांच्या वाढीसाठी खरोखर काय महत्त्वाचं असतं?

**मुलांची उंची मुख्यत: या गोष्टींवर अवलंबून असते :**

- आनुवंशिकता (आई-वडिलांची उंची)
- योग्य पोषण
- पुरेशी झोप
- हार्मोनल आरोग्य
- शारीरिक हालचाल
- एकूण जीवनशैली

फक्त जिम केल्याने उंची थांबत नाही आणि फक्त लटकण्याने उंची अचानक वाढतही नाही. शारीरिक हालचालींचा मेंदू आणि आरोग्यावर सकारात्मक परिणाम आज विज्ञानाने हे स्पष्टपणे सिद्ध केले आहे की नियमित व्यायाम, खेळ किंवा कोणतीही शारीरिक हालचाल ही फक्त शरीरासाठीच नाही तर मुलांच्या मेंदूच्या आरोग्यासाठीसुद्धा अत्यंत फायदेशीर असते.

**योग्य व्यायामामुळे :**

- मेंदूकडे रक्तपुरवठा सुधारतो
- एकाग्रता वाढते
- स्मरणशक्ती सुधारते
- ताण आणि चिडचिड कमी होते
- आत्मविश्वास वाढतो

तसेच नियमित शारीरिक हालचालींमुळे शरीरातील वाढीसाठी आवश्यक हार्मोन्स अधिक चांगल्या प्रकारे कार्य करतात. त्यामुळे मुलांच्या एकूण वाढीवर आणि विकासावर सकारात्मक परिणाम दिसून येतो. जेव्हा मुलांचा शारीरिक विकास, मानसिक आरोग्य, ताकद, स्टॅमिना, आत्मविश्वास सुधारतो, तेव्हा त्यांच्या फिटनेस आणि जीवनमानामध्येही मोठी सुधारणा दिसून येते.

आजची खरी समस्या - निष्क्रिय जीवनशैली

आजकाल अनेक मुलं मोबाईल, सोशल मीडिया, व्हिडिओ गेम्स, टीव्ही, तासनतास बसून अभ्यास याचा परिणाम फक्त शरीरावरच नाही तर मेंदूच्या आरोग्यावरही होताना दिसतो. यामुळे शारीरिक हालचाली कमी होणे, चुकीचं पोश्चर, डोळ्यांवर ताण, मानसिक थकवा, एकाग्रता कमी होणे, झोपेच्या समस्या, सामाजिक संवाद कमी होणे अशा अनेक समस्या वाढताना दिसतात. म्हणूनच आजच्या काळात मुलांसाठी नियमित व्यायाम आणि शारीरिक हालचाल ही चैनीची गोष्ट नसून अत्यावश्यक गरज बनली आहे. मुलांसाठी जिम म्हणजे नेमकं काय? पालकांच्या मनात 'जिम' म्हटलं की लगेच हेवी डम्बेल्स आणि बॉडीबिल्डिंगचा विचार येतो. पण मुलांसाठी फिटनेस ट्रेनिंग म्हणजे: बॉडीवेट एक्सरसाइज, मोबिलिटी ड्रिल्स, कोऑर्डिनेशन ट्रेनिंग क्रीडा प्रकार - स्ट्रेचिंग, बॅलन्स एक्सरसाइज,हलकं रेझिस्टन्स ट्रेनिंग. मजेशीर शारीरिक हालचाली - हे सर्व मुलांच्या हाडांसाठी, स्नायूंसाठी, पोश्चरसाठी, लवचिकतेसाठी आत्मविश्वासासाठी अत्यंत फायदेशीर ठरतात. योग्य जिम आणि योग्य मार्गदर्शन का महत्त्वाचं आहे? प्रत्येक जिम मुलांसाठी योग्य असेलच असं नाही.

मुलांना फिटनेस ट्रेनिंग देताना सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे - योग्य वातावरण आणि प्रशिक्षित मार्गदर्शन.

**एक चांगलं फिटनेस सेंटर :** मुलांच्या वयानुसार प्रशिक्षण देतं, सुरक्षिततेला प्राधान्य देतं, जड वजनापेक्षा योग्य तंत्रावर भर देतं अनुभवी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण देतं आणि मुलांच्या योग्य शारीरिक वाढीसाठी मदत करतं. पालकांनी कोणती भूमिका घ्यावी? १. फिटनेसला शिक्षा बनवू नका 'जा व्यायाम कर नाहीतर जाड होशील' असं बोलू नका. फिटनेसबद्दल सकारात्मक वातावरण तयार करा. २. तुलना करू नका प्रत्येक मुलाची वाढ वेगळी असते. उंचीपेक्षा निरोगी जीवनशैलीवर अधिक लक्ष द्या. ३. योग्य मार्गदर्शन निवडा मुलांना प्रशिक्षित ट्रेनर आणि सुरक्षित वातावरणामध्ये ट्रेनिंग द्या. ४. खेळ आणि हालचालींना प्रोत्साहन द्या धावणे, पोहणे, फुटबॉल, योगा, मार्शल आर्ट्स, सायकलिंग — कोणतीही शारीरिक हालचाल मुलांसाठी फायदेशीर असते. ५. पोषण आणि झोप याकडे लक्ष द्या प्रोटीन, कॅल्शियम, जीवनसत्त्वे, योग्य आहार आणि ८–१० तासांची झोप वाढीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. योग्य मार्गदर्शनाखाली केलेलं जिम किंवा फिटनेस ट्रेनिंग हे मुलांच्या वाढीचं शत्रू नाही. तर त्यांच्या निरोगी, सक्षम आणि आत्मविश्वासपूर्ण भविष्याचा मजबूत पाया ठरू शकतं

**गणेश अंभोरे,**
द फिटनेस हब
( फिटनेस प्रोफेशनल अँड न्यूट्रिशनिस्ट )

## व्यंकटेश बालाजी हायस्कूलने केला
# यश प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार



प्रतिनिधी १० मे

**मूर्तिजापूर :** स्थानिक व्यंकटेश बालाजी इंग्लिश हायस्कूलची २२ वर्षापासून ची परंपरा कायम राखत यंदाही दहावीच्या परीक्षेचा निकाल १०० टक्के लागल्याने विद्यार्थ्यांसह पालक वर्ग व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने आनंद व्यक्त करण्यात येत आहे. एस. एस. सी. परीक्षा फेब्रुवारी मार्च २०२६ करिता विद्यालयातून १४० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी ४३ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहे तर ११८ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

कु. गार्गी सचिन माटोडे ही विद्यार्थी ९८.६० टक्के गुण घेऊन शाळेतून प्रथम आली आहे. कु अनुष्का कोल्हे ९७.६०, कु हरीप्रिया तिवारी ९७.२०, कु अमृता मोरे ९७.२०, निर्भय पजई ९६.८०, अथर्व शंकरपुरे ९६.६०, कु शर्वरी लांडे ९६.६०, कु आदिती कावरे ९६.६०, प्रथमेश पंचबुद्धे ९५.८०, परम शर्मा ९५.४०, चिराग तांबे ९५.२०, नक्षत्रा घाटे ९५.०० या प्रमाणे टक्केवारी प्राप्त करून ९५ टक्के पेक्षा जास्त टक्केवारी मिळवण्याचा बहुमान मिळवलेला आहे. गणित या विषयात कु. गार्गी सचिन माटोडे, अथर्व शंकर पुरे व कु. शर्वरी लांडे यांनी १०० पैकी १०० गुण प्राप्त केलेले आहे.

**उपस्थित यशस्वी विद्यार्थ्यांचा पालकासह सत्कार**

संस्थेचे अध्यक्ष प्रा. अवधूत ढेरे, सचिव राजश्री ढेरे, प्राचार्य सारिका कडू, पर्यवेक्षिका मीनाक्षी महाजन यांच्या हस्ते करण्यात आला.

# हिवरखेड पोलिसांनी केली ४० गोवंश कातडी जप्त




प्रतिनिधी १० मे

**हिवरखेड :** अडगाव बु. ते मालठाणा मार्गाने एका वाहनात ४० गोवंशाची कातडी घेऊन जात असताना पोलिसांनी आरोपीला अटक केली. यामध्ये ४० गोवशांची कातडी अंदाजे किंमत ४० हजार, एक मोबाईल, २ लाख किमतीची पिकअप असा एकूण २ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी अब्दुल्लाखा महेबुबखा अडगाव बु. विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. ठाणेदार गजानन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल बुंदे, उमेश चव्हाण, योगेश इंगळे, रविद्र रंदे, यांनी केली, शासकीय पंचासह गोवंशाची कातडी नष्ट करण्यात आली.

# सावरगाव अत्याचार ग्रस्त पिडीत मुलीची व कुटुंबीयांची वंचित बहुजन आघाडीच्या वतीने भेट

प्रतिनिधी १० मे



**आलेगाव :** चान्नी पोलीस स्टेशन अंतर्गत सावरगाव येथे अत्यंत माणुसकीला काळीमा फासणारी व मन हेलावून टाकणारी घटना घडली होती. १० वर्षाच्या चिमुकलीवर त्याच गावातील घराशेजारी राहणा-या नराधमाने अमानुष अत्याचार केला. वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हा व तालुक्यातील आजी माजी पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी कुटुंबातील लोकांची भेट घेऊन पीडित मुलीला व त्यांच्या कुटुंबाला धीर दिला. तसेच न्याय मिळेपर्यंत वंचित बहुजन आघाडी पिडिते साठी लढा देत राहील अशी ग्वाही दिली.

यावेळी अकोला जिल्हा महिला आघाडीच्या माजी अध्यक्ष प्रभाताई शिरसाट, माजी जि.प.अध्यक्ष संगीताताई अढाऊ, मायाताई इंगळे, मंदाताई शिरसाट, पातुर तालुक्याचे माजी अध्यक्ष विक्रम सिंग जाधव, तालुका महिला आघाडी अध्यक्ष अर्चनाताई डाबेराव, माजी उपसभापती इमरान खान मुमताज खान, तालुका महासचिव मंगेश गोळे, कोषाध्यक्ष राजीव भाई राणा, भाऊ डाबेराव, दिलीप ताजने, अमित ताजने, निलेश करवते, बाळापुर पंचायत समितीच्या माजी सभापती रूपालीताई गवई, मीनाक्षीताई शेळके, सरलाताई मेश्राम,उमाताई अंभोरे, वर्षाताई अंभोरे, सुरेखाताई डाखोरे, उमेश गवई,भास्कर अंभोरे उपस्थित होते.

# शाहबाबू उर्दू हायस्कूल आलेगावचा १०० टक्के निकाल




**आलेगाव :** येथील शाहबाबू उर्दू हायस्कूलचा इयत्ता १० वीचा निकाल १००टक्के लागला. शाळेतील ६८ पैकी ६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्यापैकी ४० विद्यार्थी विशेष श्रेणीत, २४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, तर ०४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांची टक्केवारी सालेहा खानम शेख तय्यब ९१.६० टक्के, आलेशा फातेमा ९०.६०टक्के, मुसफेरा मोहतेशम: ९०.२०टक्के. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल संस्थचे सचिव सय्यद इसहाक राही यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच मुख्याध्यापक मोबीन, पर्यवेक्षक सादिक आणि सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# शरणं गच्छामी ! विश्वशांतीसाठी बुद्धभूमी शिर्ला येथे विशेष महापरित्राण

प्रतिनिधी १० मे



**पातूर :** बुद्ध पौर्णिमेनिमित्त बुद्धभूमी परिवेण शिर्ला बुद्धविहारात पूजन, मिरवणूक व विविध धार्मिक विधी झाले. बुद्ध पौर्णिमेनिमित्त दि. १ मे ला विविध कार्यक्रम झाले.

पांढऱ्या वेशात उपासकांनी भगवान गौतम बुद्धांच्या प्रतिमेचे पूजन केले पातूर तालुक्यातील शिर्ला येथील श्रमण चॅरिटेबल ट्रस्ट, बुद्धभूमी शिर्ला च्या वतीने बुद्धपौर्णिमेच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणाकरिता तथा विश्वशांतीसाठी बुद्ध पौर्णिमेच्या पूर्वसंध्येला ३० एप्रिल रोजी सायंकाळी ६:०० वाजतापासून ते १ मे सकाळी ६:०० वाजेपर्यंत महापरित्राण प्रार्थना करण्यात आली. यावेळी भिक्षु संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष भदंत बि संघापालजी महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली पूज्य भदंत श्रद्धपालजी व दहा दिवसीय श्रामनेर संघाने रात्रभर बारा तास अखंडितपणे महापरित्राण प्रार्थना बोधिवृक्षाची महापूजा करण्यात व आली. यानंतर बुद्ध पौर्णिमेला सकाळी सात वाजता भिक्षु संघाने मिरवणूक काढली. त्यानंतर जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत भगवान बुद्ध यांच्या पवित्र धातूचे पूजन करून बुद्धांच्या अस्थी उपासकांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आल्या. या कार्यक्रमाला जिल्हाभरातून बौद्ध अनुयायी उपस्थित होते. यावेळी भिक्षु संघाची चारीका देखील झाली. त्यानंतर पूज्य भदंत बि. संघापालजी महाथेरो व पूज्य भदंत श्रद्धपालजी यांनी उपस्थित अनुयायांना धम्मदेसना देऊन समस्त मानव जातीच्या व सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणाप्रती मंगल कामना व्यक्त करून आशीर्वाद दिले.

# न्यू इंग्लिश शाळेच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**अकोला :** न्यू इंग्लिश हायस्कूल मध्ये शहरातील तसेच आजूबाजूच्या परिसरातील विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यांचे यश आमच्या साठी अभिमानास्पद आहे असे मुख्याध्यापक माधव मुंशी म्हणाले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे तोंड गोड करून त्यांनी अभिनंदन केले. तसेच त्यांना शुभेच्छा दिल्या.

यशस्वी झालेल्या मध्ये प्रीती ज्ञानदेव काकडे ही गुणवंत शासकीय एलिमेंटरी व इंटरमिजीएट चित्रकला ग्रेड परीक्षेत विदर्भातूत प्रथम व महाराष्ट्रातून १६ वी मेरीट होती. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे यश डोळ्यात भरणारे आहे. शाळेमध्ये १० वीच्या विद्यार्थ्यांकडे सत्राच्या सुरुवातीपासूनच लक्ष दिले जाते, सराव करून घेतल्या जातो. त्यामुळे निकाल देखील चांगला लागतो.

## पावसाळ्यापूर्वी नाल्यांची स्वच्छता आवश्यक

**अकोला :** शहरातील नाल्यांची स्वच्छता पावसाळ्यापूर्वी करणे आवश्यक आहे. नाही तर नाल्यातील पाणी रस्त्यावर येऊन अडचणी निर्माण होतात. महापालिका प्रशासनाने या संदर्भात पाहणी करून विविध प्रभागातील नाले, नाल्यांची स्वच्छता करून घ्यावी अशी मागणी केली जात आहे.

## निधन वार्ता

### उषा खिंवसरा



**अकोला :** येथील बिर्ला कॉलनीतील रहिवासी उषा मोहनलाल खिंवसरा जैन ६७, यांचे रविवारी निधन झाले. त्यांची अंतिम यात्रा आज सायंकाळी ५ वाजता 'राधाकुंज अपार्टमेंट', जलाराम मंदिराच्या मागे, बिर्ला कॉलनी येथून निघेल. त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार आहे.

# प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटचा निकाल १०० टक्के




**आलेगाव :** प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटने इयत्ता १० वीच्या परीक्षेत 'उत्कृष्ट निकालाची परंपरा' कायम ठेवली. यंदाच्या परीक्षेत शाळेतून एकूण ३८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते आणि विशेष म्हणजे हे सर्व ३८ ही विद्यार्थी सुयशासह उत्तीर्ण झाले आहेत. शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून, गुणवत्तेचा स्तर इतका उच्च आहे की, सर्वच्या सर्व ३८ विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण प्राप्त केले.


भक्ती काळे: ९६.८०टक्के (प्रथम), स्वाधा ठाकरे ९४.४०टक्के (द्वितीय), सोहम सातारकर ९३.२०टक्के (तृतीय), अथर्व धोत्रे ९३.००टक्के (चतुर्थ). विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शाळेचे आधारस्तंभ सुभाष जैन यांनी आनंद व्यक्त केला. तसेच पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी प्रवीण डाबेराव, केंद्रप्रमुख निवास चव्हाण,अध्यक्ष अक्षय जैन आणि मुख्याध्यापक महावीर जैन यांनी यशस्वी विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन व शाळेत त्यांचे तसेच त्यांच्या पालकांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. विद्यार्थ्यांची कठोर मेहनत, शिक्षकांचे अहोरात्र परिश्रम आणि पालकांचा विश्वास यामुळे शाळेचे नाव जिल्ह्यात गौरवाने घेतले जात आहे,' असे मुख्याध्यापक महावीर जैन म्हणाले.

# सस्ती येथील सनराईज ज्ञानपीठ स्कूलचा निकाल १०० टक्के !

प्रतिनिधी १० मे



**चतारी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात आलेल्या मार्च २०२६ च्या एस.एस.सी. (१० वी) परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत तालुक्यातील सनराईज ज्ञानपीठ सेमी इंग्लिश स्कूल व ज्यु. कॉलेज, सस्ती या विद्यालयाने आपल्या यशाची सलग आठव्या वर्षी शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. विशेष म्हणजे सर्वच विद्यार्थी प्राविण्य श्रेणीमध्ये उत्तीर्ण होऊन ९० टक्केच्या वर ३० विद्यार्थ्यांनी गुण मिळवलेले आहे सनराईज ज्ञानपिठ ची विद्यार्थिनी वैष्णवी राखोडे हिने ९७.०० टक्के गुण मिळवून शाळेतून प्रथम येण्याचा मान पटकवला तसेच हर्षल कीर्तने ९६.८०टक्के श्रीहरी राठोड ९६.६०टक्के शुभम राखोडे: ९५.८० टक्के अभय बुंधे: ९५.६०टक्के वेदांत ताले: ९५.६०टक्के ऋतुजा मोकळकर: ९४.८०टक्के संस्कार वानखडे: ९४.६०टक्के शिवम दांदळे: ९४.२०टक्के श्रेया इंगळे ९४.००टक्के अक्षय नागोलकर ९४.०० टक्के सार्थक सालोकर ९३.८० टक्के प्रणय सुडोकर ९३.८०टक्के भक्ती खडके९३.२० टक्के यश इंगळे ९३.२०टक्के श्रावणी बोचरे९३.२०टक्के विध्यार्थाच्या या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्रीकांतजी ताले सर, कोशाध्यक्षा सौ. चैताली ताले, मुख्याध्यापिका इंगळे मॅडम, तसेच समस्त शिक्षक वृंद आणि सस्ती परिसरातील नागरिकांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे.



भारत सरकार
महाराष्ट्र शासन
सोमनाथ
सोमलिङ्गं नरो दृष्ट्वा सर्वपापैः प्रमुच्यते।
लभते फलं मनोवाञ्छितं मृतः स्वर्गं समाश्रयेत्॥
सोमनाथ
७५ वर्षे गौरवशाली वारशाची
सोमनाथ हे भारताच्या समृद्ध संस्कृतीचे प्रतीक आहे. हजारो वर्षांपासून विध्वंसक आक्रमणांना सामोरे जाऊनही सोमनाथ आजही आपल्या अभिमान आणि शौर्याचे प्रतीक म्हणून अढळपणे उभे आहे.
७५ वर्षांपूर्वी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दृढ संकल्पामुळे आधुनिक सोमनाथाच्या पुनरुत्थानाचा मार्ग सुरळीत झाला. आज प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ही पवित्र भूमी भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाची गौरवशाली साक्ष देत आहे.
या सुवर्णमयी ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हा!
मुख्य उपक्रम
कलश यात्रा | भजन संध्या | ओंकार मंत्राचे सामूहिक जप
सोमनाथ पुस्तिकेमध्ये मंत्र लेखन | सोमनाथाशी संबंधित कथांचे कथन
श्री सोमनाथ मंदिर परिसर, प्रभास पाटण | ८ ते ११ मे, २०२६
“सोमनाथ ही अशी यशोगाथा आहे जी आपल्याला शिकवते की सृजनाची शक्ती ही विध्वंसाच्या शक्तीपेक्षा कितीतरी अधिक महान असते.”
प्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदी (अध्यक्ष, श्री सोमनाथ ट्रस्ट)
लोकराज्य
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री
सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री
सोमनाथच्या गौरवशाली १००० वर्षांचा वारसा अधिक समृद्ध करण्यासाठी योगदान द्या.
येथे स्कॅन करा

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. १० मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# रेमंड यूको डेनिमचा अंतरिम अर्ज फेटाळला

## यवतमाळ औद्योगिक न्यायालयाचा कामगारांना दिलासा

प्रतिनिधी १० मे

**यवतमाळ :** यवतमाळ औद्योगिक न्यायालयाने रेमंड यूको डेनिम प्रा. लि. यवतमाळच्या कामगारांविरुद्ध दाखल केलेल्या अंतरिम स्थगिती अर्जास नकार दिला असून, कामगार संघटनांना मोठा दिलासा दिला आहे. कंपनी व्यवस्थापनाने २१ जुलै २०२५ रोजी कामगारांनी बेकायदेशीर संप, आंदोलन व कामकाजात अडथळा निर्माण केला असल्याचा आरोप करत न्यायालयात तक्रार दाखल केली होती.

अंतरिम स्थगिती आदेशाच्या मुदतवाढीसाठी दाखल अर्जावर सुनावणी दरम्यान, प्रहार कामगार संघटना आणि भारतीय विश्वकर्म मिल मजदूर संघटनांचे वकील ॲड. वैभव एडके यांनी न्यायालयासमोर स्पष्ट केले की, ३१ जुलै २०२५ रोजी व्यवस्थापन आणि सर्व नोंदणीकृत कामगार संघटनांमध्ये लेखी समझोता झाला होता. त्या नंतर कामगार शांततेत कामावर रुजू झाले व उत्पादन पूर्ववत सुरू झाले. याच पार्श्वभूमीवर न्यायालयाने नमूद केले की, सध्या कोणताही संप किंवा आंदोलन सुरू नाही. कामगार कोणत्याही विघातक कृतीत सहभागी नाहीत, तसेच संघटनांविरोधात कोणतीही पोलिस तक्रार दाखल नाही. त्यामुळे कंपनी व्यवस्थापनाला कोणतीही अपूरणीय हानी होण्याची शक्यता नसल्याचे सांगत, अंतरिम दिलासा अर्ज नामंजूर करण्यात आला.

> ■ कामगार संघटनांनी हा निर्णय कामगारांच्या लोकशाही हक्कांना आणि सामोपचार प्रक्रियेला बळ देणारा असल्याचे स्वागत केले आहे. संघटना म्हणतात की, "न्यायालयाने स्पष्ट केले की कामगार शांततेत काम करत आहेत. तरीही काही मुद्यांवर अजून तोडगा लागलेला नाही; लवकरच यावरही निर्णय होईल."

## रानडुकराचा महिलेवर हल्ला

प्रतिनिधी १० मे

**यवतमाळ :** पालोती येथील एका महिलेवर रानडुकराने अचानक हल्ला केल्याची घटना दि. 9 मे रोजी मोहदा शिवारात घडली. या हल्ल्यात महिला गंभीर जखमी झाली असून तिच्यावर यवतमाळ येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगला सुनील शेंद्रे (वय 40, रा. पालोती) या मोहदा शिवारात तिळ कापणीच्या कामासाठी गेल्या होत्या. दरम्यान, अचानक एका रानडुकराने सुरंग घेत त्यांच्या अंगावर धाव घेत हल्ला केला. या हल्ल्यात त्या गंभीर जखमी होऊन रक्तबंबाळ झाल्या.

घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र मेटीखेडा येथे दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना तातडीने वसंतराव नाईक शासकीय रुग्णालय, यवतमाळ येथे हलविण्यात आले. दरम्यान, परिसरात रानडुकरांचा वाढता वावर नागरिकांसाठी धोकादायक ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे. वन विभागाने तत्काळ उपाययोजना करून वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा तसेच जखमी महिलेला आर्थिक मदत व उपचार सहाय्य द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## विदर्भातील पहिले ॲस्ट्रोटर्फ हॉकी मैदान यवतमाळात; ९ कोटींच्या प्रकल्पाचे भूमिपूजन



प्रतिनिधी १० मे

**यवतमाळ :** जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या विदर्भातील पहिल्या ॲस्ट्रोटर्फ हॉकी मैदानाचे भूमिपूजन तसेच सिंथेटिक हॅण्डबॉल कोर्टचे लोकार्पण बुधवारी जिल्हा क्रीडा संकुल येथे उत्साहात पार पडले. सुमारे ९ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या या अत्याधुनिक प्रकल्पामुळे जिल्ह्यातील खेळाडूंना आधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

पालकमंत्री मा. संजय राठोड यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील खेळाडू व क्रीडांगणांच्या विकासासाठी विविध शासकीय योजनांमधून अधिकाधिक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे सांगितले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने खेळाडूंना उत्तम सुविधा देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास आमदार किसन वानखेडे, नगर परिषद अध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके, जिल्हाधिकारी डॉ. विकास मीना, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की तसेच जिल्हा क्रीडाधिकारी शिल्पा चाबुकस्वार यांची प्रमुख उपस्थिती होती.

विशेष अतिथी म्हणून बोलताना जिल्हाधिकारी डॉ. विकास मीना यांनी जिल्हा क्रीडा संकुल समितीमार्फत सुरू असलेल्या विविध विकासकामांची माहिती देत जिल्हा प्रशासन खेळाडूंच्या पाठीशी कायम उभे राहील, अशी ग्वाही दिली. जिल्हा क्रीडाधिकारी शिल्पा चाबुकस्वार यांनी प्रास्ताविकातून जिल्हा क्रीडा संकुलातील विविध क्रीडा सुविधांचा आढावा मांडला.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन अनंत पांडे यांनी केले. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता विक्रांत शिरभाते, आंतरराष्ट्रीय हॉकीपटू आकाश चिकटे तसेच क्रीडा क्षेत्रातील मान्यवर देवेंद्र चपेरिया, शाहिद सैय्यद, जितेंद्र खोब्रागडे, अजय शेकदार, बॉबी बागडे, सागर पथथे, पवन पथथे, अतीक शेख, धिरज यादव, चरण राठोड, अतुल येवले, आकाश वानखेडे, राजू जॉन, पराग पिंगळे, नीलेश भगत, अविनाश जोशी, विकास शेळके, जितेंद्र सातपुते आणि गौरव निंभोरकर यांच्यासह मोठ्या संख्येने हॉकी खेळाडू व क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

# राष्ट्रीय लोकअदालतीत ६६८७ प्रकरणे निकाली

## ४ जोडप्यांचा संसारही पुन्हा जुळला



प्रतिनिधी १० मे

**यवतमाळ :** राष्ट्रीय लोकअदालतीला यवतमाळ जिल्ह्यात वकील, पक्षकार आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शनिवारी (ता. ९) आयोजित करण्यात आलेल्या लोकअदालतीत तब्बल ६६८७ प्रकरणे आपसी तडजोडीद्वारे निकाली काढण्यात आली. विशेष म्हणजे, कौटुंबिक वाद मिटवत ४ जोडप्यांचा संसार पुन्हा मार्गी लागला.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व न्यायालयांत राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष शेखर चु. मुनघाटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

यावेळी उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथील न्यायमूर्ती नंदेश शं. देशपांडे हे ऑनलाइन उपस्थित होते. त्यांनी लोकअदालतीचे महत्त्व अधोरेखित करत जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीद्वारे निकाली काढण्याचे आवाहन केले. यावेळी एस. यु. बघेले, जिल्हा न्यायाधीश-१, यवतमाळ, दिपक एच. दाभाडे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, यवतमाळ, पि. एस. इंगळे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१, यवतमाळ तसेच मोहन गिरटकर, सचिव, जिल्हा वकील संघ, यवतमाळ उपस्थित होते.

लोकअदालतीत न्यायालयातील प्रलंबित तसेच वादपूर्व प्रकरणांचा समावेश करण्यात आला होता. विविध राष्ट्रीयीकृत बँका व पतसंस्थांच्या प्रकरणांनाही प्राधान्य देण्यात आले. प्रकरणे तडजोडीद्वारे निकाली काढण्यासाठी शेखर चु. मुनघाटे आणि दिपक एच. दाभाडे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व न्यायाधीशांनी विशेष प्रयत्न केले. यासाठी वेळोवेळी शासकीय अधिकारी, वकील, पक्षकार तसेच विविध संस्था व राष्ट्रीयीकृत बँकांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेण्यात आल्या.

या लोकअदालतीत १२५२ प्रलंबित प्रकरणे आणि ५४३५ वादपूर्व प्रकरणे अशी एकूण ६६८७ प्रकरणे निकाली काढण्यात आली. निकाली निघालेल्या प्रकरणांचे एकूण तडजोड मूल्य ९ कोटी ९२ लाख १० हजार ८६२ रुपये इतके होते. विशेष मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील विविध न्यायालयांतून ५६४ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

राष्ट्रीय लोकअदालत यशस्वी करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, यवतमाळ तसेच तालुका विधी सेवा समित्या, सर्व न्यायाधीश व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. यासाठी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा सरकारी वकील, सहायक सरकारी वकील, उपजिल्हाधिकारी, भू-अर्जन अधिकारी, बेंबळा प्रकल्पाचे अधिकारी व कर्मचारी, विविध बँका, संस्था, विमा कंपन्यांचे अधिकारी, पोलीस अधिकारी, विभाग नियंत्रक महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, यवतमाळ, वकील मंडळी, स्वयंसेवक यांचे सहकार्य लाभले.

तसेच आर. जे. काझी, अधीक्षक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, यवतमाळ, जिल्ह्यातील सर्व न्यायलयीन कर्मचारी, तालुका विधी सेवा समित्यांचे कर्मचारी आणि इतर सहकाऱ्यांचेही मोलाचे योगदान राहिले.

## पोलीस बॉईज असोसिएशनच्या हॉकी स्पर्धेबाबतची तक्रार फेटाळली

प्रतिनिधी १० मे

**यवतमाळ :** यवतमाळ येथे महाराष्ट्र पोलीस बॉईज असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेबाबत करण्यात आलेली "अनधिकृत स्पर्धा" अशी तक्रार हॉकी असोसिएशन डिस्ट्रिक्ट ऑफ यवतमाळ सचिव मनिषा आकरे यांनी केलेली तक्रार जिल्हा प्रशासनाने फेटाळली आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या निर्णयानुसार संबंधित तक्रार निराधार ठरवत पोलीस बॉईज असोसिएशनची बाजू योग्य असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार, सदर हॉकी स्पर्धा अनधिकृतपणे आयोजित करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. मात्र, या संदर्भात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने केलेल्या तपासणीत असे निदर्शनास आले की, खाजगी संस्था त्यांच्या नियम व उद्दिष्टांनुसार, कोणताही शासकीय निधी न वापरता स्वतंत्रपणे क्रीडा स्पर्धांचे आयोजन करू शकतात.

तसेच, महाराष्ट्र पोलीस बॉईज असोसिएशनकडून आयोजित करण्यात आलेल्या या राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेसाठी कोणताही शासकीय निधी देण्यात आलेला नसल्याचेही स्पष्ट झाले आहे. स्पर्धेदरम्यान खेळाडूंची कोणतीही फसवणूक झाल्याची तक्रारही संबंधित कार्यालयाला प्राप्त झालेली नाही.

सदर स्पर्धा ही खाजगी स्वरूपाची असून, खेळाडूंना सरावाची संधी मिळावी आणि हॉकी खेळाचा प्रचार-प्रसार व्हावा या उद्देशाने ती आयोजित करण्यात आल्याचेही पत्रातून स्पष्ट करण्यात आले आहे.

या सर्व बाबींचा विचार करून संबंधित तक्रार निकाली काढण्यात आली असून, जिल्हा क्रीडा अधिकारी तथा सचिव, जिल्हा क्रीडा परिषद शिल्पा चाबुकस्वार यांनी हा निर्णय जाहीर केला आहे.

या निर्णयामुळे पोलीस बॉईज असोसिएशनला मोठा दिलासा मिळाला असून, पोलिस बॉईज संघटने मुळे सर्व क्रीडा मंडळांना स्पर्धा घेण्याचे स्वातंत्र आणि आधार मिळाला आहे.

पोलिस बॉईज संघटनेच्या धाडसाचे यवतमाळ जिल्हा तसेच महाराष्ट्र क्रीडा क्षेत्रात कौतुक होत आहे. भविष्यात अशा क्रीडा स्पर्धांचे आयोजन अधिक जोमाने होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## श्री.म.द.भारती माध्य. विद्यालयाचा ९६.३३% निकाल; सायली रणनवरे तालुक्यात प्रथम

प्रतिनिधी १० मे

**आर्णी :** आर्णी तालुक्यातील श्री दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळ संचालित श्री म.द. भारती





माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, आर्णी (मुख्य शाखा) यांचे विद्यार्थी सत्र २०२५-२०२६ एस.एस.सी. परीक्षेत चमकदार यश मिळवित आहेत. विद्यालयाचा सरासरी निकाल ९६.३३% लागला आहे.

आर्णी तालुका व विद्यालयात प्रथम क्रमांक मिळवणारी कु. सायली विनोद रणनवरे ९६.००% गुणांनी आघाडीवर आहे. द्वितीय क्रमांक कु. तृप्ती दत्ता शेगर ९२.२०% आणि तृतीय क्रमांक कु. साफीया जावेद सोळंकी ९०.६०% गुणांनी मिळविला.

संस्थेची ही उज्वल परंपरा माजी संस्थाध्यक्ष स्वं. डॉ. संजयजी रा.भारती यांच्या प्रेरणेने ९४ वर्षांपासून चालू आहे. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा डॉ. किरणताई सं. भारती, सचिव ॲड. सिध्दार्थजी सं. भारती, उपाध्यक्ष समृध्दजी सं. भारती, कोषाध्यक्ष प्रियदर्शनजी रा. भारती, संचालिका अश्विनीताई प्रियदर्शन भारती, प्राचार्य ए .डी. जगताप, उपमुख्याध्यापक डी. व्ही. नन्नावरे, पर्यवेक्षक पी.पी. वानखडे, आर.जी. नामदेववार यांच्यासह शिक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## साकळे विद्यालयाचा ८८.०५ टक्के निकाल



प्रतिनिधी १० मे

**उमरखेड :** येथील साकळे विद्यालयाचा यावर्षीचा शालांत परीक्षेचा निकाल ८८.०५ टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयाच्या यशस्वी निकालामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

विद्यालयातून कु. श्वेता गजानन शिंदे हिने ९३.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. शांभवी संदेश देशमुख हिने ९२.२० टक्के गुणांसह द्वितीय, तर आर्यक रविंद्र जोशी याने ९०.२० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच कु. धनश्री रमेश रणमळे हिने ८८.२० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## शनिवारी सकाळी बरसला पाऊस

प्रतिनिधी १० मे

**यवतमाळ :** अवकाळी पावसाने शनिवारी सकाळी जिल्ह्यातील काही भागात जोरदार हजेरी लावली. गुरूवारी जिल्ह्यात पाऊस बरसला होता. त्यानंतर शनिवारी सकाळी पुन्हा विजांच्या गडगडाटात पाऊस कोसळला. यवतमाळ शहरासह महागाव तालुक्यातील धनोडा परिसरातही पाऊस झाला. ढगाळ वातावरण व पावसामुळे तापमानाचा पारा थेट ३ अंशाने घसरून ३८ अंशावर आला आहे. रात्रीचे ही तापमान २० अंश इतके नोंद झाले आहे. अवकाळी पावसाचा फटका शेतकऱ्यांना सहन करावा लागत आहे. मुग, भुईमूग, तीळ ही पिके काढणीला आली असताना पावसाचे संकट उभे ठाकले आहे.

## स्व.उत्तमराव देशमुख स्कूलचा शंभर टक्के निकाल

प्रतिनिधी १० मे

**आर्णी :** स्व. उत्तमराव देशमुख इंग्लिश मिडियम स्कूलचा फेब्रुवारी २०२६ च्या





दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला असून, बोर्ड मान्यतेच्या पहिल्याच वर्षी विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीच्या जोरावर हा यशस्वी निकाल लागल्याने शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या निकालात कु. यशस्वी किशोर सावंत हिने ८८.६० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. पूजा प्रेम राठोड हिने ८८.४० टक्के गुणांसह द्वितीय, तर कु. आनंदी सुमेध बागेश्वर हिने ८७.८० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. कु. श्रावणी भीमराव ठाकरे हिने ८६.६० टक्के गुणांसह चौथा क्रमांक, शिवानंद बळीराम वंजारे याने ८१.८० टक्के गुणांसह पाचवा क्रमांक, तर कु. तेजस्विनी सुधाकर राठोड हिने ८१ टक्के गुणांसह सहावा क्रमांक पटकावला.

शाळेतील एकूण १२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. सर्व विद्यार्थी प्राविण्यासह उत्तीर्ण झाल्याने शाळेच्या यशात भर पडली आहे.

विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय संस्थेचे अध्यक्ष डॉ. पंडितराव चव्हाण, मुख्याध्यापिका कोमल चव्हाण, व्यवस्थापक उल्हास चव्हाण, पर्यवेक्षक आशिष मोरे तसेच शिक्षकवृंद आणि पालकांना दिले.

# आदिवासी साहित्याची गंगोत्री लोकसाहित्यच : प्रा.डॉ.तुकाराम रोंगटे

प्रतिनिधी १० मे



**यवतमाळ :** आदिवासी बांधवांनी हजारो वर्षे आपल्या वाणी, लोकगीत आणि मौखिक परंपरेतून जतन केलेली सांस्कृतिक परंपराच आदिवासी साहित्याची खरी गंगोत्री असल्याचे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. तुकाराम रोंगटे यांनी केले.

नवोदित आदिवासी साहित्य परिषद आणि जिज्ञासा बहुउद्देशीय संस्था, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चौथ्या नवोदित आदिवासी साहित्य संमेलनात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. रविवारी (दि. ३ मे २०२६) पार पडलेल्या या संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्रा. वसंत कनाके होते, तर फडकी मासिकाचे संपादक व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. संजय लोहकरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. रोंगटे यांनी आदिवासी समाजाच्या मौखिक परंपरेतील समृद्धतेवर प्रकाश टाकला. पाहुण्यांचे स्वागत करण्याच्या पद्धती, सासूने सुनेचे आणि जावयाचे केलेले वर्णन, पुनर्जन्माविषयीची भूमिका, मुसळधार पाऊस, जंगलचा राजा, दुष्काळातील भ्रष्टाचार अशा विविध सामाजिक संदर्भांना आदिवासी समाजाने लोकगीतांतून आणि उपमांमधून कसे व्यक्त केले, याची उदाहरणे त्यांनी सादर केली.

"ज्याने प्रथम मद्याचा, पद्याचा आणि गद्याचा शोध लावला तो आदिवासीच होता. शेतीचा शोध लावणारी स्त्रीही आदिवासी होती. पहिला संशोधक, शास्त्रज्ञ, विधिज्ञ, वास्तुविशारद, शल्यचिकित्सक आणि चित्रकारही आदिवासीच होता," असे सांगत त्यांनी आदिवासी समाजाच्या ज्ञानपरंपरेचा गौरव केला.

आदिवासींच्या मौखिक संपदेचा अभिजात साहित्याने केवळ लोकसाहित्याच्या चौकटीत बंदिस्त करून मोठी हानी केली असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. लोकसाहित्यावर आदिवासींऐवजी बिगर आदिवासींचा कब्जा कसा झाला, असा परखड सवाल करत त्यांनी उपस्थितांना अंतर्मुख केले.

संमेलनास साहित्य, संस्कृती आणि आदिवासी अभ्यास क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरकुल योजनेपासून वंचित लाभार्थ्यांना पुन्हा संधी द्या

## प्रीती शिवरामवार यांची नगराध्यक्षांकडे निवेदनाद्वारे मागणी

प्रतिनिधी १० मे

**आर्णी :** नगर परिषद अंतर्गत प्रधानमंत्री घरकुल योजनेच्या २०२४-२५ च्या डीपीआरनुसार मंजूर झालेल्या शंभरहून अधिक लाभार्थ्यांना आर्थिक परिस्थितीअभावी योजनेचा लाभ घेता आला नाही. या लाभार्थ्यांना विशेष बाब म्हणून पुन्हा घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी प्रीती योगेश शिवरामवार यांनी नगराध्यक्षांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



अनेक लाभार्थी आर्थिक अडचणींमुळे घरकुल बांधकामाची प्रक्रिया पूर्ण करू शकले नाहीत. त्यामुळे ते योजनेपासून वंचित राहिले. याशिवाय प्रभाग क्रमांक १० मधील भाजी मंडी रोडवरील नाली बांधकाम गेल्या महिन्याभरापासून संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संबंधित काम तातडीने पूर्ण करण्याची मागणीही करण्यात आली.

दरम्यान, शहरातील मच्छी बाजार हा वर्दळीच्या रस्त्यावर असल्याने मासे विक्रेत्यांकडून रस्त्यावर दुकाने लावली जात असून त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. पर्यायी व्यवस्था होईपर्यंत नियोजित पोलीस स्टेशनच्या जागेवर मासे विक्रीस परवानगी द्यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

> ■ सध्या अनेक लाभार्थी पुन्हा योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक असून त्यांनी पीएमसीकडे संपर्क साधला असता, तांत्रिक कारणांमुळे लाभ देणे शक्य नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे वंचित लाभार्थ्यांना पुन्हा संधी देण्याची मागणी करण्यात आली आहे.

सिटी न्यूज अमरावती

रविवार, दि. १० मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा उद्या

**अमरावती:** कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि. नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील मोर्शी रोड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (आयटीआय) येत्या ११ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता 'प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्या'चे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून आयटीआय उत्तीर्ण व अन्य पात्र उमेदवारांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. या भरती मेळाव्यामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील नामांकित 'एनआरबी बेअरिंग या कंपनीसह अमरावती जिल्ह्यातील विविध स्थानिक नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यासाठी फिटर, वेल्डर, इलेक्ट्रिशियन, डिझेल मेकॅनिक, ऑटो इलेक्ट्रिशियन, मशीन टूल मेंटेनन्स आणि मोटर मेकॅनिक या व्यवसायातून आयटीआय उत्तीर्ण उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार आहे.

# राजापेठ अंतर्गत विविध भागांची अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्याकडून पाहणी

## ◆ नाले स्वच्छता, अतिक्रमण हटविणे व उद्यान देखभालीबाबत निर्देश

प्रतिनिधी १० मे

**अमरावती:** अमरावती महानगरपालिकेच्या झोन क्र. ०२ राजापेठ अंतर्गत प्रभाग क्रमांक १८ मधील विविध भागांची आज शनिवार, दिनांक ०९ एप्रिल २०२६ रोजी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

यामध्ये फरशी स्टॉप, दस्तूर नगर, बालाजी मंगल कार्यालयाजवळील नाला, कवर नगर परिसरातील नाले व रस्ते, व्ही.आय.पी. अपार्टमेंट शेजारील नाला, शंकर नगरचा नाला तसेच केडिया नगर उद्यान परिसराचा समावेश होता.

पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त यांनी सर्व नाल्यांची नियमित व सखोल स्वच्छता करून त्यातील गाळ तात्काळ उचलण्याचे निर्देश दिले. नाल्यामध्ये कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर सातत्याने कडक दंडात्मक कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच रस्ते व सार्वजनिक ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ ठेवण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले.



केडिया नगर उद्यानाची पाहणी करताना

राहिवासी भागांमधील अनधिकृत अतिक्रमण तात्काळ हटवून संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, तसेच धोकादायक व वाढलेल्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करून रस्ते व पादचारी मार्ग मोकळे ठेवण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

उद्यान परिसर स्वच्छ, सुस्थितीत व नागरिकांसाठी सुरक्षित ठेवण्यावर भर देण्यात आला. नियमित देखभाल, पाणीपुरवठा व हरित क्षेत्र संवर्धनाकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देशही दिले. दरम्यान, नाल्यामध्ये कचरा टाकताना एक नागरिक आढळून आल्याने अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक मॅडम यांच्या निर्देशानुसार संबंधित नागरिकावर स्पॉट फाईन रु. ५००/- आकारण्यात आला.

या पाहणी दौऱ्यावेळी प्रभागातील नगरसेवक प्रा. प्रशांत वानखडे, महेश मूलचंदानी, पद्मजा कौंडण्य, नंदा सावदे, सहायक आयुक्त भूषण पुसतकर, जे. स्वा. नि. श्रीकांत डवरे, शहर समन्वयक श्वेता बोके, स्वास्थ निरीक्षक पवन चावरे, मिथुन वाघमारे तसेच बिटप्यून कोणार्क कंपनी चे सुपरवायझर उपस्थित होते.

# आयआयएचटी बरगढ व वेंकटगिरी येथे हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका प्रवेशाबाबत सुचना जारी

प्रतिनिधी १० मे

## १० जूनपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**अमरावती:** केंद्र शासनाच्या भारतीय हातमाग तंत्रविज्ञान संस्थेत सन २०२६-२७ या शैक्षणिक सत्रासाठी तीन वर्षीय (सहा सत्रीय) हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्राच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र राज्यातील पात्र उमेदवारांकडून १० जून २०२६ पर्यंत विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत असल्याची माहिती वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैन यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

महाराष्ट्र राज्यासाठी ओडिशा राज्यातील बरगढ येथील भारतीय हातमाग तंत्रविज्ञान संस्थेत १३६१ जागा उपलब्ध असून, आंध्र प्रदेशातील वेंकटगिरी येथील संस्थेसाठी २ जागा काउन्सिलिंग प्रक्रियेद्वारे भरण्यात येणार आहेत. या प्रवेश प्रक्रियेसाठी इच्छुक उमेदवारांनी आपले परिपूर्ण अर्ज प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, नागपूर, सोलापूर, मुंबई व औरंगाबाद कार्यालयामार्फत सादर करावेत. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १० जून २०२६ असून अर्ज कार्यालयीन वेळेत स्वीकारण्यात येणार आहेत.

अर्जाचा नमुना, पात्रता निकष तसेच इतर आवश्यक माहिती वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच कार्यालयाच्या सूचना फलकावरही माहिती प्रदर्शित करण्यात आली असल्याचे वस्त्रोद्योग विभागाव्दारे कळविण्यात आले आहे.

विदर्भातील ११ जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, प्रशासकीय इमारत क्र. २, ८ वा माळा, 'बी' विंग, सिव्हील लाईन्स, नागपूर -४४०००१ येथे संपर्क साधावा. तसेच अधिक माहितीसाठी दूरध्वनी ०७१२-२५३७९२७ यावर संपर्क साधावा विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत अर्ज सादर करून या व्यावसायिक शिक्षणाच्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन वस्त्रोद्योग विभागाव्दारे करण्यात आले आहे.

# गोल्डन किड्सच्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम, युक्ती अविनाश भोगे प्रथम



प्रतिनिधी १० मे

**अमरावती:** लेडी यशोदाबाई जोशी लेडीज क्लब, कॅम्प अमरावती, द्वारा संचालित गोल्डन किड्स इंग्रजी माध्यमिक शाळा, अमरावती विभागीय शिक्षण मंडळ अमरावती फेब्रु/मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

गोल्डन किड्स इंग्रजी माध्यमिक शाळेचा निकाल ९८.२७ज्ञ् लागलेला आहे. एकूण विद्यार्थी २३२ परीक्षेला बसले होते त्यापैकी २२८ उत्तीर्ण झालेले आहेत. १२३ विद्यार्थ्यांनी प्राविण्य श्रेणी प्राप्त केलेली असून ६८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. शाळेची विद्यार्थिनी कु.युक्ती अविनाश भोगे हिने ९९.४०ज्ञ् गुण प्राप्त करून शाळेतून प्रथम येण्याचा मान मिळविला असून तिने गणित आणि संस्कृत या विषया मध्ये पूर्ण गुण मिळविले आहेत.

उत्तीर्ण विद्यार्थी आपल्या यशाचे श्रेय संस्थेच्या सचिव मा.हर्षदा पांडे अध्यक्षा सौ सुरुची चांदले, संस्थेचे पदाधिकारी व शाळेचे मा.प्राचार्य श्री उमाशंकर सिंगरोल, पालक तथा शिक्षक वृंदाना देतात.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन एल.वाय.जे लेडीज क्लबच्या मा. सचिव, अध्यक्षा, मुख्याध्यापक, शिक्षकांनी केले. तसेच त्यांच्या उज्ज्वल भविष्यकरिता शुभेच्छा दिल्या.

# परिमंडळ वीज चोरीमुक्त होणार- मुख्य अभियंता, अशोक साळुंके

## ◆ महावितरणने वर्षभरात केला ६,४२२ वीज चोरांचा पर्दाफाश ◆ परिमंडळात दरमहा २४०० वीज चोरी पकडण्याचे उद्दिष्ट

प्रतिनिधी १० मे

**अमरावती:** वीज चोरी विरोधात महावितरणने कंबर कसली आहे. गेल्या वर्षभरात राबविलेल्या धडक मोहिमेत अमरावती परिमंडळात एकुण ६ हजार ४२२ वीज चोरांचा पर्दाफाश केला असून, संबंधितांवर एकूण २० कोटी ७५ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. वीज चोरीमुळे सुरळीत वीज पुरवठ्यावर परिणाम होत असल्याने परिमंडळ वीज चोरीमुक्त करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. त्यामुळे यापुढे वीज चोरी विरूद्धची मोहीम आणखी तीव्र करण्याचे निर्देश मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिले आहे.



**वीज चोरी हा दंडनीय गुन्हा**

वीज चोरी हा दंडनीय गुन्हा असून अनधिकृत वीज वापरामुळे यंत्रणेवर अतिरिक्त भार पडतो आणि परिणामी वीज पुरवठ्यात अडथळे निर्माण होतात. त्यामुळे नागरिकांनी वीज चोरी टाळावी तसेच कारवाईसाठी आलेल्या पथकांना सहकार्य करावे. मोहिमेत अडथळा आणणाऱ्यांविरोधातही गुन्हा दाखल करण्यात येईल, असे निर्देश मुख्य अभियंता अशोक. साळुंके यांनी दिले आहे.

**२२३ भरारी पथकाच्या माध्यमातून होणार कारवाई**

या मोहिमेसाठी परिमंडळात एकूण २२३ पथके कार्यरत करण्यात आली आहेत. यामध्ये २१० शाखा कार्यालयांची पथके, ८ विभागीय पथके, सुरक्षा व अंमलबजावणी विभागाची ३ पथके तसेच स्काडा विभागाची २ पथके यांचा समावेश आहे.

**इतर जिल्ह्यातील भरारी पथकाचीही मदत घेणार**

मोहिमेला अधिक गती देण्यासाठी इतर जिल्ह्यांतील भरारी पथकांचीही मदत घेण्यात येणार आहे. याबाबत उपसंचालक सुरक्षा व दक्षता विभाग नागपूर परिक्षेत्र यांना पत्र देवून नागपूर परिक्षेत्रातील इतर जिल्ह्यातून भरारी पथक पाठविण्याची मागणी केली आहे.

प्रत्येक महिन्याला किमान २४०० वीज चोरी पकडण्याचे उद्दिष्ठ :-

वीज चोरीला आळा घालण्यासाठी परिमंडळातील प्रत्येक विभागाला दरमहा किमान ३०० प्रकरणे उघडकीस आणण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यानुसार प्रत्येक विभागाने दरमहा ३ कोटी रुपयांचे महसूल वीज चोरीतून वसूल करणे अपेक्षित आहे. परिमंडळाअंतर्गत अमरावती व यवतमाळ जिल्ह्यांत प्रत्येकी चार असे एकूण आठ विभाग कार्यरत असून, या सर्व विभागांना मिळून दरमहा २,४०० प्रकरणांवर कारवाई करावी लागणार आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेतील अपूर्ण घरकुलबाबत महानगरपालिकेचा कडक इशारा

## मुदतीत बांधकाम पूर्ण न करणाऱ्या लाभार्थ्यांची नावे योजनेतून वगळण्याची कारवाई; प्रशासनाची अंतिम सूचना

प्रतिनिधी १० मे

**अमरावती:** प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बेनिफिशियरी लेड कन्स्ट्रक्शन घटकात मंजूर करण्यात आलेल्या घरकुलांचे बांधकाम निश्चित कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक असताना अनेक लाभार्थ्यांनी अद्यापही घरकुलांचे काम अपूर्ण ठेवले असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेने संबंधित लाभार्थ्यांना अंतिम इशारा देत तातडीने बांधकाम पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे.

महानगरपालिकेच्या प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत शहरातील अनेक नागरिकांना घरकुलांसाठी शासनामार्फत आर्थिक अनुदान मंजूर करण्यात आले होते. या योजनेचा उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू नागरिकांना स्वतःचे पक्के घर उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र, काही लाभार्थ्यांनी मंजूर निधी मिळाल्यानंतरही बांधकाम निर्धारित वेळेत पूर्ण केले नसल्याचे आढळून आले आहे.

प्रशासनाकडून संबंधित लाभार्थ्यांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच बांधकाम लवकर पूर्ण करण्यासाठी वारंवार पाठपुरावा करण्यात आला होता. तरीदेखील अनेक प्रकरणांमध्ये घरकुलांचे बांधकाम अपूर्ण असल्यामुळे आता महानगरपालिकेने कठोर भूमिका घेतली आहे. महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे की, ज्या लाभार्थ्यांनी अद्याप बांधकाम पूर्ण केले नाही, अशांची यादी अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीतील लाभार्थ्यांनी तात्काळ काम सुरू करून दिलेल्या मुदतीत बांधकाम पूर्ण करणे आवश्यक राहणार आहे. प्रशासनाच्या सूचनेनुसार, सदर सूचना प्रसिद्ध झाल्यानंतर पाच दिवसांच्या आत प्रत्यक्ष बांधकाम सुरू करणे आवश्यक आहे. तसेच पुढील एक महिन्याच्या कालावधीत घरकुलाचे काम पूर्ण न झाल्यास शासन नियमांनुसार संबंधित लाभार्थ्यांची नावे प्रधानमंत्री आवास योजनेच्या यादीतून कमी किंवा कायमस्वरूपी वगळण्यात येऊ शकतात. यासोबतच, शासनाकडून मंजूर झालेले अनुदान परत गेल्यास किंवा लाभ रद्द झाल्यास त्यासाठी अमरावती महानगरपालिका जबाबदार राहणार नसल्याचेही प्रशासनाने स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी या सूचनेकडे गांभीर्याने पाहून तातडीने बांधकाम पूर्ण करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

अपूर्ण घरकुलांच्या लाभार्थ्यांची संपूर्ण यादी महानगरपालिकेच्या https://mis.pmayamravatied.com/pay_return या अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली असून संबंधितांनी आपले नाव तपासण्याचे आवाहन करण्यात आले आहे अशी माहिती महानगरपालिकेचे शहर अभियंता रविंद्र पवार यांनी दिली आहे.

# परंपरागत कला - संस्कार शिबीरात निरंतर सेवा

## ◆ गाडगेबाबा मंडळाद्वारे ३९ वर्षांचे सातत्यपूर्ण सहकार्य

प्रतिनिधी १० मे

**दर्यापूर :** श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या स्थानिक रत्नाबाई राठी विद्यालय येथे गेल्या ३९ वर्षांपासून सुरू असलेल्या उन्हाळी संस्कार शिबिरातील शेकडो विद्यार्थी यांना दरवर्षी सातत्याने एक दिवशीय अल्पोउपहाराची सेवा परंपरा जोपासली आहे. निष्काम सेवा कर्मी महेश (शेखर) पाटील व चित्रकला शिक्षक स्व. हेमंत पाकधुने यांच्या दूरदृष्टी वैचारिक संकल्पनेतून कला जथ्था या वैशिष्टपूर्ण संस्कार शिबराची निर्मिती झाली असून प्रथम वर्षापासून ते सलग ३९ वर्षापर्यंत हे शिबिर रत्नाबाई राठी विद्यालयाच्याच भव्य प्रारंगणात संपन्न होत आले आहे. विविध क्षेत्रातील अनेक विद्यार्थी व खेळाडू यांनी या शिबिराचा लाभ घेऊन आपल्या सुनियोजित जीवन कार्यात यश संपादन केलेले आहे. दर्यापूर परिसरातून नेमून दिलेल्या दिवसाला मान्यवर तथा विविध संस्था हया या शिबिरात आत्पोउपहाराची सेवा अर्पण करीत असतात. गाडगेबाबा मंडळा ने ही सेवा ३९ वर्ष सातत्याने ही सेवा पूरविल्याने ही संस्था विशेष आभिनंदनास पात्र असल्याचे गौरवउद्गार रत्नाबाई राठी विद्यालयाचे मुख्याध्यापक विलास मुळे यांनी प्रतिपादीत केले. या दिर्घ सेवा कार्याबाबत गाडगेबाबा मंडळाचे अध्यक्ष प्रा गजानन भारसाकळे यांची प्रतिक्रिया जाणून घेतली असता संस्कार शिबिरे हे सर्वोत्तम तथा परीपूर्ण विद्यार्थी व खेळाडू घडविण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे मत व्यक्त केले. कला - जथ्था शिबीराचे जनक शेखर पाटील हे गाडगेबाबा मंडळाचे संस्थापक सचिव आहेत ही बाब सुद्धा इथे उल्लेखनीय ठरते.



# आईचे प्रेम व ममता...! पोटच्या मुलीला किडनी देऊन दिला पुनर्जन्म

प्रतिनिधी १० मे

## ◆ डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात यशस्वी किडनी प्रत्यारोपण

**अमरावती :** स्थानिक डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय अमरावती, येथे आईने आपल्या मुलीच्या प्रेमापोटी किडनी दान करून मुलीला दिला पुनर्जन्म. डॉ पंजाबराव वैद्यकीय महाविद्यालयात नुकतेच एक किडनी प्रत्यारोपण यशस्वी पूर्ण झाले. अकोला जिल्ह्यातील बाळापुर स्थित वास्तव्यात असणारे ३८ वर्षी अनुश्री विनोद गोळे यांना गेल्या सहा महिन्यापासून बीपी वाढणे, श्वास भरून येणे, अशा सारखा त्रास होत असताना, स्थानिक पातळीवर तपासणी केली असता, अनुश्रीच्या दोन्ही किडन्या बरोबर काम करीत नाही. अशा परिस्थितीत त्यांनी अकोला येथे खाजगी मध्ये उपचार सुरू केले. डॉ नी त्यांना किडनी प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. त्यानुसार त्यांनी नागपूर येथील किंग्सवे हॉस्पिटल येथे धाव घेतली. परंतु प्रत्यारोपणाची तयारी करीत असताना होणारा खर्च त्यांना झेपणारा नव्हता व नागपूर त्यांच्याकरिता त्रासदायक होत असल्यामुळे त्यांनी डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात ट्रान्सप्लांट कॉर्डिनेटर सतीश वडनेरकर यांच्याशी संपर्क साधून माहिती करून घेतली.



रुग्ण :- अनुश्री गोळे    डोनर :- उषा महल्ले

अनुश्रीची आई पथ्रोट येथे राहणारी उषा साहेबराव महल्ले, वयाने सत्तरीच्या घरात असताना देखील मुलीच्या प्रेमापोटी किडनी दान देण्यास तयार झाली व पुढील प्रक्रिया पूर्ण करून समाजापुढे पुन्हा एका आईने आपल्या अपत्याप्रति असलेले प्रेम, त्याग व ममता सिद्ध केले व समाजाला अवयवदानाचा यातून संदेश दिला. नेफ्रोलॉंजीस्ट डॉ हितेश गुल्हाने यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार घेत असताना, किडनी प्रत्यारोपणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ अनिल देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ पवन टेकाडे, डॉ सोमेश्वर निर्मळ, यांच्या मार्गदर्शनाखाली यूरोलॉजीष्ट डॉ राहुल पोटोडे, डॉ विक्रम देशमुख, डॉ विशाल बाहेकर, डॉ राहुल घुले, डॉ प्रतीक चिरडे, डॉ आचल सिंगल, नेफ्रॉलॉजीष्ट डॉ हितेश गुल्हाने, बधिरीकरण तज्ञ डॉ विजया पाटील, डॉ स्वप्निल नागे, डॉ रोहित हातगावकर, डॉ किरण हिरूळकर, डॉ रिकेश म्हात्रे, डॉ ॠतुजा परिहार, डॉ शिवलीला मेनकुंद्धे, यांचा मोलाचा वाटा होता. पाच ते सहा तास चाललेली ही शस्त्रक्रिया यशस्वी पार पडली.

रुग्ण व नातेवाईकांचे समुपदेशन, पोलीस वेरिफिकेशन, कायदेशीर बाबीची पूर्तता या सर्व बाबी पूर्ण करून प्राधिकरण समिती समोर सादर करणे व प्रत्यक्ष मुलाखती द्वारे शस्त्रक्रियेला मान्यता मिळवून घेणे. यात ट्रान्सप्लांट कॉर्डिनेटर सतीश वडनेरकर यांची महत्त्वाची भूमिका होती.

प्राधिकरण समिती अध्यक्ष डॉ अनिल देशमुख, सदस्य डॉ अमोल नरोटे, प्रतिनिधी उपसंचालक आरोग्यसेवा अकोला, डॉ विनोद पवार सिविल सर्जन, डॉ अविनाश लव्हाळे, सेवानिवृत्त उपसंचालक, डॉ पवन टेकाडे, डॉ रामअवतार सोनी, डॉ शुभांगी वर्मा, डॉ किशोर बनसोड यांनी रुग्ण, डोनर व नातेवाईक यांची प्रत्यक्ष मुलाखती द्वारे संवाद साधून व पडताळणी करून शस्त्रक्रिये करीता मान्यता दिली.

शस्त्रक्रिया दरम्यान ओटीमध्ये परिचारिका संध्या वाघमारे, प्रियंका मैद, सुमित्रा घाडगे, गंगा पाटील, मोहिनी गोहत्रे, राणी खेकडे, आशिष बोकडे, वैभव नासरे, प्रतीक्षा भिसेकर, अरविना जांभेकर, रोशन मेश्राम यांनी काम पाहिले. व पुढील दहा दिवस किडनी अति दक्षता विभागात शितल अंबरते, दामिनी ढवळे शशिकांत ढिवर, नेहा घोरपडे, श्रेया धांडे, प्रतीक्षा दामोदर, काजल गुर्जर, ममता चव्हाण, ममता इरतकर, वैष्णवी मरसकोले, जतीन दडमल हे कार्यरत राहणार आहे. रुग्णालय व्यवस्थापक डॉ श्रीकांत फुटाणे, मेट्रन चित्रा देशमुख, एम एस डब्ल्यू अनिकेत माहोरे, सहायक आरती मोरांडे यांची शस्त्रक्रिया पूर्व तयारीत मोलाचे सहकार्य होते. ही अत्यंत महागडी असलेली शस्त्रक्रिया शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत करण्यात आली. तसेच शस्त्रक्रिया पूर्व देखील बऱ्याच चाचण्या रुग्णालय स्तरावरून मोफत करण्यात आल्यामुळे रुग्णाला बराच दिलासा मिळाला. कुटुंबीय सदस्यांनी शस्त्रक्रिया बाबत समाधान व्यक्त केले. सध्या रुग्ण व डोनर, किडनी आयसीयू मध्ये डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार घेत असून प्रकृती स्थिर आहे.

गोपाल सावरकर, मधुर भुयार, उमेश सोनवणे, उमेश चव्हाण, मंगेश गुलधे, वर्षा गाढवे, प्रशांत खडसे, आकाश हंबर्डे, निलेश धोंगळे यांनी सहायक म्हणून कर्तव्य पार पाडले.

किडनी प्रत्यारोपण सारखी अत्यंत अवघड व जटिल शस्त्रक्रिया डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे यशस्वी झाल्याबद्दल संस्था अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व पदाधिकारी यांनी सर्व डॉक्टरांचे, नर्सिंग स्टाफ तसेच महाविद्यालय व रुग्णालय प्रशासनाचे अभिनंदन केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

रविवार दि. १० मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

जीवन प्राधिकरणचे करोडो रूपये 'पाण्यात'

# साहेब, नळाचे पाणी कुठे झाले गायब !

## * योजना सुरू दाखवा आणि बक्षीस मिळवा * ४० वर्षापासून एकाही गावात सुरू नाही योजना *पाणी कर भरायचा कशाला?

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

ग्रामीण भागात जनतेला स्वच्छ पाणी देण्यासाठी शासनाच्यावतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या वतीने पेयजल योजना राबविण्यात येत आहे. मात्र ४० वर्षापासून वाशीम जिल्ह्यातील करोडो रूपये खर्च करून उभारलेल्या नळ योजनेतून अद्यापही जिल्ह्यातील कोणत्याच गावात पाणी पुरवठा सुरू झाला नसल्याचे चित्र आहे. ज्या गावात सुरू झाला त्या गावात मात्र कागदोपत्री दाखविण्यात आला आहे. त्यामुळे शासनाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे विभागाचे शेकडो करोडो रूपये तीन वेळा निधी येवूनही 'पाण्यात' गेले आहेत. या विभागात अधिकारी व ठेकेदाराच्या संगणमताने करोडो रूपयाचा महाघोटाळा झाला असून ही योजना सुरू नसतांनाही ग्रामपंचायतीकडून कर वसूली मात्र कशासाठी केल्या जाते असा प्रश्न जनतेला पडला आहे. आता ह्याच योजना जलजीवन मिशनच्या नावाखाली पुन्हा सुरू करण्याऐवजी भ्रष्टाचाराच केल्या जात आहे.फक्त कारंजा शहरातच जलजीवन मिशनची नळ योजना सुरू आहे.





शासनाच्या वतीने ग्रामीण भागात पाणी पुरवठा करण्यासाठी जीवन प्राधिकरणची स्थापना करण्यात आली. मात्र या विभागातील अधिकारी व ठेकेदारांनी वाशीम जिल्ह्यात स्वातंत्र्य काळापासून राबविण्यात आलेल्या योजनेत अंतर्गत एकाही गावात प्रत्यक्षात पाणी पुरवठा केला नाही. भ्रष्टाचाराची वाळवी लागलेल्या ठेकेदारांनी व अधिकाऱ्यांनी संपूर्ण योजनाच हडप केली.

लाखो रूपये पगार घेणाऱ्या अधिकाऱ्यांनी जनतेकडून मात्र कर वसूली केली. प्रत्यक्षात मात्र कुठेही पाणी पुरवठा केला नाही. आता या भ्रष्टाचारावर पडदा टाकण्यासाठी या योजनेचे पुनरूज्जीवन करून मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद असलेल्या पाणी पुरवठा योजनेला शेकडो करोडो रूपयाचा निधी तीन वेळा प्राप्त झाले आहेत. या नळयोजना चालू करण्यासाठी सोलर पंपही बसविण्यात येणार आहे. आधिच्याच करोडो रूपयाचा घोटाळा करून सुरू न केलेल्या अर्धवट अवस्थेत असलेल्या ग्रामीण भागाच्या नळयोजना पुन्हा नव्याने सुरू करण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडून निधी देण्यात आला. मात्र भ्रष्टाचाराने पोखरून टाकलेल्या अधिकारी व ठेकेदारांना आता जुन्या भ्रष्टाचारावर नवीन भ्रष्टाचार करायला संधी मिळणार आहे. अगोदरच करोडो रूपये खर्च करूनही कधीही न सुरू झालेली नळयोजना कागदोपत्री सुरू दाखविली होती. किंवा खाजगी नळयोजना ग्रामपंचायतीला हाताशी धरून आपली नळयोजना सुरू असल्याचे दाखविले आहे. आता ह्याच जुन्या नळयोजना जलजीवन मिशनच्या नावाखाली थातुरमातूर सुरू करून पुन्हा अधिकारी व ठेकेदार महाघोटाळ करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे हक्काचे पाणी जनतेपर्यंत पोहोचल किंवा नाही याची श्वाश्वती देता येत नाही. त्यामुळे जुनी

नळयोजना सुरू दाखवा आणि बक्षीस मिळवा किंवा जनतेनी आता पाण्यासाठी पेटून उठायची गरज आहे. काही अधिकाऱ्यांनी या संबंधि विचारणा केली असता बंद पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषदेकडे वळत्या करण्याची विनंती केली होती. मात्र त्या जिल्हा परिषदेने स्वीकारली नाही. तर योजना जिल्हा परिषदेला द्यायची असेल तर माग अधिकाऱ्यांना पगार कशाचा द्यायचा असा प्रश्न पडतो. अधिकारी व ठेकेदार योजनेत भ्रष्टाचार करून हडप करण्यासाठीच असतात काय? असा प्रश्न सर्व सामान्य जनतेला पडला आहे. त्यामुळे ह्या योजना सुरू करण्यासाठी गाव पातळीवर पाणी द्या अन्यथा पाणी पेटवा आंदोलन उभारण्याची गरज आहे.


जीवन प्राधीकरणचे करोडो रूपये 'पाण्यात'!

* योजना सुरू दाखवा आणि बक्षीस मिळवा * ४० वर्षापासून एकाही गावात सुरू नाही योजना *पाणी कर भरायची कशाला?

करोडो रूपये भ्रष्टाचारातून कुठे वळविले...

नळाचे नव्हे तर तोंडचेही पाणी पळविले !

*जिल्ह्यात अनेक गावात तीव्र पाणी टंचाई * ४० वर्षापासून एकाही गावात सुरू नाही योजना

*तीन वेळा आला शेकडो कोटीचा निधी

*कागदोपत्रीच योजनेचा केला विधी

*आता जलजीवन मिशनच आधी

करोडो रूपये 'पाण्यात'

शुक्रवार दि ८ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

भ्रष्टाचाराची चतु:सूत्री, योजना कागदोपत्री !

* योजना सुरू दाखवा आणि बक्षीस मिळवा * ४० वर्षापासून एकाही गावात सुरू नाही योजना *पाणी कर भरायची कशाला?

## थोडक्यात

### मागास वस्तीतील मुलींना केले मोफत सॅनिटरी पॅड वाटप



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शेलुबाजार रोडवरील झोपडपट्टी येथे शाळकरी मुली व मागास वस्तीतील महिला व मुलींना मोफत सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले. सदर उपक्रम महाराष्ट्र असंघटित महिला कामगार व कर्मचारी सेना (महाराष्ट्र राज्य) आणि स्वयंमसाहायत्ता महिला बहुउदशीय संस्था वाशीमच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला.

महाराष्ट्र असंघटित महिला कामगार व कर्मचारी सेनेच्यावतीने मुली व महिलांच्या आरोग्यासाठी लोकपयोगी काम करत असून, या संस्थेने अनेक महिलांना मोफत सॅनिटरी पॅडचे वाटप केल्याची माहिती संस्थापक अध्यक्षा प्रा. संगिता चव्हाण यांनी दिली.यावेळी उपस्थित महिला व मुलींना मार्गदर्शन करतांना प्रा. संगिता चव्हाण म्हणाल्या की, महिलांचा महत्वाचा विषय म्हणजे मासिक पाळी, मात्र आजही गरीब वस्तीतील महिला व मुली मासिक पाळीत कपडा किवा गोणपाट अशा गोष्टी वापरतात. कापडाचा वापर सोडून महिलांनी सॅनिटी पॅड चा वापर करावा व आपल्या आरोग्याची काळजी घेवून स्वत:चे संरक्षण करावे असे आवाहन त्यांनी केले. हा उपक्रम सतत सुरु राहणार पूर्ण महाराष्ट्र भर राबविण्यात येणार असल्याची त्यांनी यावेळी सांगितले. सदर उपक्रमाला संस्थापक अधक्षा प्रा. संगीता चव्हाण, संगीता ढोले, आणि संघटनेच्या वाशीम अध्यक्ष वनिता पांडे उपस्थित होत्या.

## आगीत सर्वस्व जळाल्याने झाले निराधार मदतीच्या हाताने दिला जगण्याचा आधार !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

क्रांतीनगर परिसरात लागलेल्या भीषण आगीत वर्षा सागर अंभोरे यांचे घर पूर्णतः जळून खाक झाले होते. या दुर्घटनेत संसारोपयोगी साहित्य, घरातील महत्त्वाच्या वस्तू तसेच अनेक वर्षांची कष्टाची कमाई काही क्षणांत राख झाली. अचानक ओढवलेल्या या संकटामुळे अंभोरे कुटुंबीयांवर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला होता.

या हृदयद्रावक घटनेची माहिती मिळताच नगरसेवक पुरणकुमार लालचंद बदलानी यांनी तत्परता दाखवत मदतीसाठी पुढाकार घेतला. त्यांच्या विशेष प्रयत्नांतून अशोक अग्रवाल



(संचालक : ग्रेइंफ्रा प्रा. लि.) यांनी सामाजिक बांधिलकी जपत अंभोरे कुटुंबाला मदतीचा हात दिला. नुकसानभरपाई म्हणून तब्बल १ लाख ६१ हजार रुपयांची रोख मदत वर्षा सागर अंभोरे यांना सुपूर्द करण्यात आली.ही मदत नगरसेविका श्रद्धाताई इंगोले, नगरसेवक निलेशभाऊ जीवनानी तसेच सिंधी समाजाचे अध्यक्ष गोकुलचंदजी जीवनानी यांच्या हस्ते देण्यात आली.

यावेळी अमोलभाऊ इंगोले, रंजनाताई पॉलकर यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत पीडित कुटुंबाला दिलासा देणारी ही मदत सुपूर्द करण्यात आली.यावेळी उपस्थितांनी 'समाजात माणुसकी अजून जिवंत आहे' याची प्रचिती आल्याची भावना व्यक्त केली. संकटाच्या काळात मिळालेली ही मदत अंभोरे कुटुंबासाठी केवळ आर्थिक आधार नसून नव्याने उभं राहण्याची ताकद देणारी ठरली. भावूक झालेल्या वर्षा सागर अंभोरे व त्यांच्या कुटुंबीयांनी नगरसेवक पुरण बदलानी, अशोक अग्रवाल तसेच उपस्थित सर्व मान्यवरांचे मनःपूर्वक आभार मानले. 'आमचं सर्व काही जळून गेलं होतं, मात्र समाजातील या मदतीच्या हातामुळे आम्हाला पुन्हा जगण्याची उमेद मिळाली,' अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

## श्री पारेश्वर विद्यालय दहावीच्या निकालात सुयश

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

येथून जवळ असलेल्या पार्डी टकमोर येथील श्री पारेश्वर विद्यालयाने यावर्षी झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत घव-घवीत यश प्राप्त केले.

या विद्यालयाचा एकूण निकाल ८४.६६३एवढा लागला.

परीक्षेला एकूण १६३विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी ५७ विद्यार्थी विशेष प्राविण्य, ५३ विद्यार्थी प्रथम, २३ विद्यार्थी द्वितीय, तर ५ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत उत्तीर्ण झाले.यामध्ये कु. आजचं राजेश चौधरी ९३ टक्के गुण घेऊन प्रथम ,विनायक विष्णू भोयर ९१ टक्के द्वितीय ,राम गजानन महाले ९०.८०, पूनम गणेश महाले ९०.८० तृतीय ,रूपाली गणेश महाले ९० चतुर्थ गौरव गजानन भालेराव ८९.८०टक्के गुण घेऊन पाचवा आला.या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांनी आपले आई-वडील मुख्याध्यापक बी.एम.वाघमारे व सर्व शिक्षक वृंदाना दिले.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रामभाऊ चौधरी ,सचिव केशवराव चौधरी माजी प्राचार्य सोपानराव कांबळे यांनी या निकालाचे बद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या निकालामुळे विद्यार्थ्यांचे सर्वत्र परिसरात कौतुक होते.

## केशवनगरातील अवैध धंदे बंद करा, अन्यथा रास्तारोको आंदोलन

### बाळासाहेब उर्फ भागवत वाघ यांचा इशारा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

रिसोड तालुक्यातील मोजे केशवनगर येथे सुरू असलेल्या अवैध धंद्यांविरोधात आता नागरिकांचा संताप उफाळून आला असून, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब उर्फ भागवत वाघ यांनी थेट पोलीस अधीक्षकांकडे निवेदन देत तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.दिलेल्या निवेदनात केशवनगर परिसरात जुगार, सट्टा-मटका तसेच अवैध दारू विक्री मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

या अवैध व्यवसायांमुळे गावातील वातावरण बिघडत असून सामान्य नागरिक, युवक आणि कुटुंबांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.गावात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या या प्रकारांमुळे सामाजिक स्वास्थ्य धोक्यात आले असून अनेक कुटुंबांवर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. विशेषतः युवक वर्ग या अवैध धंद्यांच्या विळख्यात अडकत असल्याने गावकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते भा. कु. वाघ यांनी पोलीस प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून अवैध धंदे पूर्णपणे बंद करावेत, अशी मागणी केली आहे. तसेच वेळेत कारवाई न झाल्यास तीव्र रस्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला आहे.

## नगर 'सेवक' नव्हे ; खरा जन 'सेवक'...

## राजूभाऊचे 'राज' कारण नव्हे; समाजकारण, कोट्यावधीच्या विकास कामाचे धोरण !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

नगरसेवक युवा नेते राजभाऊ वानखेडे हे २५ वर्षापासून समाजसेवेच्या माध्यमातून राजकारण करीत आहेत.दररोज सकाळी आपल्या वार्डात व शहरात फिरून नागरिकांच्या अडचणी समजून घेत आहेत. आता राजभाऊ वानखेडे यांनी वार्डात कोट्यावधीची विकास कामे आणली आहेत त्या विकास कामाचे उद्या नगराध्यक्ष अनिल केंदळे यांच्या हस्ते भूमिपूजन होणार आहे. पालकमंत्री यांच्या निधीतून ५० लाखाची व रस्त्याच्या १ कोटी ६० लाखाच्या कामाची उद्या सुरुवात होणार आहे.





राजूभाऊ वानखेडे हे वार्डासह शहरात नाल्या साफ करणे, स्वच्छतेच्या समस्या, नळ आली की नाही, पाणी मिळाले की नाही, मोफत टॅंकरने पाणीपुरवठा करणे.रस्त्यावर लाईट लागली की नाही, ह्या सर्व मूलभूत सुविधा कडे राजेभाऊ स्वतः लक्ष देत आहेत. प्रत्येक नागरिकाजवळ जाऊन ते थेट विचारतात, 'काय काम आहे? कोणती अडचण आहे?' तुमची तब्येत कशी आहे कोणाला दवाखान्यात जायचे आहे का?आणि त्यावर तात्काळ उपाय करण्याचा प्रयत्न करतात. २५ ते ३० वर्षापासून निवडणुकीसाठी नाही तर समाजसेवेसाठी राजूभाऊ रोज नागरिकांना भेटत असून त्यांच्या समस्या ऐकून घेत आहेत.


लोकसेवा ही केवळ निवडणुकीपुरती नसून ती सातत्याने केली पाहिजे, याचा राजू भाऊ वानखेडे यांनी आदर्श घालून दिला आहे. त्यामुळेच आज वार्डातील व शहरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, राजेभाऊ वानखेडे यांच्याकडे खऱ्या अर्थाने जनतेसाठी काम करणारा नगरसेवक म्हणून पाहिले जात आहे. त्यामुळे ती निवडणूक झाल्यावर निवडणुकीपुरते नव्हे तर खरे जनसेवक बनत आहेत.

## केवळ १८ कर्मचाऱ्यांचा... पोलीस बदलीचा खेळ, काय आहे मेळ!

### वरिष्ठांची निकटवर्तीयांवर कृपादृष्टी, इतरांवर वक्रदृष्टी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम जिल्हा पोलीस दलात तत्कालीन जिल्हा पोलीस अधीक्षकांनी बदलीपूर्वीच केवळ १८ पोलीस कर्मचाऱ्यांच्या विनंती बदल्यांचे आदेश काढल्याने पोलीस विभागात आश्चर्य व्यक्त केला जात आहे . अपवादात्मक परिस्थिती आणि विशेष कारणांचा उल्लेख करत करण्यात आलेल्या या बदल्यांमुळे अनेक प्रश्न उपस्थित होत असून या निर्णयामागील नेमकी कारणे काय याबाबत उलट सुलट चर्चा होतांना ऐकू येत आहे .केवळ १८ पोलीस कर्मचाऱ्यांचा बदलीचा खेळ करून हा नेमकं मेळ काय आहे ? असा सवाल आता विचारला जात आहे.



वाशिम जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाच्या सहमतीने ३० एप्रिल २०२६ रोजी १८ पोलीस कर्मचाऱ्यांच्या विनंती बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले. हे आदेश तत्कालीन जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या स्वाक्षरीने काढण्यात आले आहेत. मात्र त्यांच्या बदलीचे आदेश आल्यानंतर जाता जाता करण्यात आलेल्या या बदल्यांमुळे पोलीस वर्तुळात विविध चर्चांना सुरुवात झाली आहे.सदर आदेशात 'अपवादात्मक परिस्थिती' तसेच 'विशेष कारणां'चा उल्लेख करण्यात आला असला तरी नेमकी ती परिस्थिती काय होती. याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे या बदल्यांमागील नेमके कारण काय याबाबत पोलीस विभागात आणि जिल्ह्यात विविध तर्क-वितर्क लावले जात आहेत.या बदल्यांमध्ये काही पोलीस कर्मचाऱ्यांना मुख्यालयातून थेट महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांमध्ये नियुक्ती देण्यात आली आहे. तर काहींना जिल्हा वाहतूक शाखेत तर काही कर्मचारी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निकटवर्ती असल्याने त्यांना स्थानिक गुन्हे शाखेत बदली देण्यात आल्याची चर्चा आहे. त्यामुळे या बदल्यांकडे जिल्ह्यात वेगळ्या नजरेने पाहिले जात आहे.

विशेष म्हणजे बदलीपूर्वी केवळ १८ कर्मचाऱ्यांवरच कृपादृष्टी का दाखवण्यात आली ? असा प्रश्न पोलीस विभागातुनच दबक्या आवाजात केला जात आहे.. या प्रकरणाची दखल घेऊन नवनियुक्त जिल्हा पोलीस अधीक्षकांनी या बदल्यांची सखोल पडताळणी करण्याची मागणीही सर्व स्तरातून केली जात आहे.

### वरिष्ठांच्या आशीर्वादाने मिळाले मनमर्जीतील ठिकाण !


वाशिमचे तत्कालीन पोलीस अधीक्षक अनुज तारे यांनी १८ पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदलीचे आदेश निर्गमित केले आहे. त्यामध्ये साहेबराव पट्टेबहादूर- पोलीस मुख्यालयातून वाशिम शहर, प्रदीप डाखोरे- पोलीस मुख्यालयातून संगणक कक्ष, श्याम पांडे- पोलीस मुख्यालयातून बीडीडीएस, विठ्ठल उगले- पोलीस मुख्यालयातून अनसिंग पोलीस ठाणे, अमोल देवढे - मोपवि, आशिषसिंह ठाकुर- मोपवि येथून बीडीडीएस, अनिल कल्हापुरे - पोलीस पोलीस मुख्यालयातून अनसिंग पोलीस ठाणे, सचिन देशमुख- पोलीस अधीक्षक वाचक शाखा येथून वाशिम ग्रामीण पोलीस ठाणे, सुभाष राठोड- वाशिम शहर येथून जिल्हा वाहतूक शाखा, प्रल्हाद तागड- वाशिम शहर येथून जिल्हा वाहतूक शाखा, अरविंद देशमुख- पोलीस मुख्यालय येथून पोलीस मुख्यालय बँक कामकाज पाहतील, निलेश राठोड- पोलीस मुख्यालयातून वाशिम शहर, आदर्श डाबेरा- पोलीस मुख्यालय क्यू आर टी येथून वाशिम शहर, बेबी राठोड- पोलीस कल्याण शाखा येथून महिला तक्रार निवारण, संतोष पाईकराव- पोलीस उपअधीक्षक गृह येथून स्थानिक गुन्हे शाखा, संतोष गिऱ्हे- पोलीस मुख्यालयातून शिरपूर पोलीस ठाणे, सलमान नंदावाले- पोलीस मुख्यालयातून वाशिम ग्रामीण, स्वप्निल तुळजापूरे -मोपवि येथून स्थानिक गुन्हे शाखा चालक म्हणून यांचा समावेश असून या कर्मचाऱ्यांना वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या आशीर्वादाने मनमर्जीतील ठिकाण मिळाल्याचा आरोप पोलीस विभागातुनच केला जात आहे.

## श्री बाकलीवाल विद्यालय व ऊच्च माध्यमिक विद्यालय वाशीमचा ९२.४७ टक्के निकाल

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे विभाग अमरावती मार्फत घेण्यात आलेल्या एसएससी फेब्रुवारी–मार्च २०२६ परीक्षेमध्ये श्री बाकलीवाल विद्यालयाचा ९२.४७ टक्के निकाल लागला आहे.

सदर परीक्षेत शाळेतील एकुण १८६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी प्राविण्य श्रेणीत ४८ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत ५२ विद्यार्थी, द्वितीय श्रेणीत ६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तसेच शाळेतुन प्रथम कु. आरती शंकर वाकुडकर ९७.६० टक्के, शाळेतुन द्वितीय अनिकेत विष्णु बोराचाटे ९५.४० टक्के, शाळेतुन तृतीय सुखद तुषार भुरे ९३.४० टक्के व कु. ईशा मनोज बांडे ९३.४० टक्के, शाळेतुन



चतुर्थ क्रमांक कु. हर्षदा गजानन खिल्लारी ९३.२० टक्के व कु. प्रांजली मदन घोडे ९३.२० टक्के हिने पटकावला आहे.

या घवघवीत यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत असुन सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय संस्थेचे अध्यक्ष मा ॲड. सुरेंद्रकुमारजी बाकलीवाल, मुख्याध्यापक मा श्री बबनराव बिल्लारी , उपमुख्याध्यापक मा श्री दंभिवाल पर्यवेक्षक श्री राठोड व सर्व शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांना दिले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
रविवार, दि. १० मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# उन्हाळखेड ठरले तालुक्यातील पहिले 'स्व– गणना' पूर्ण करणारे गाव !

## ◆ एका दिवसात २० कुटुंबांची डिजिटल नोंदणी; उत्स्फूर्त सहभाग

प्रतिनिधी १० मे

**शेगाव:** तालुक्यात डिजिटल जनगणना मोहिमेला वेग आला असून, उन्हाळखेड हे 'स्व-गणना' प्रक्रिया पूर्ण करणारे तालुक्यातील पहिले गाव ठरले आहे. गावातील २० कुटुंबांची स्व-गणना अवघ्या एका दिवसात पूर्ण करण्यात आली असून, प्रशासनाच्या या उपक्रमाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या डिजिटल स्वगणना मोहिमेत प्रशासन आणि ग्रामस्थांच्या समन्वयातून ही उल्लेखनीय कामगिरी साध्य झाली. महसूल विभागाने यासाठी विशेष परिश्रम घेतले असून, या मोहिमेवर तहसीलदार प्रज्ञा काकडे यांनी स्वतः लक्ष ठेवले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार संतोष कानडे, ऋतुजा पारखे, विजय सुरडकर, मंडळ अधिकारी राजेश राठोड, ग्राम महसूल अधिकारी नितीन जुमळे, महसूल सेवक सहदेव साठे तसेच संगणक ऑपरेटर यांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम केले. ग्रामस्थांनीही या प्रक्रियेला सकारात्मक प्रतिसाद देत प्रशासनाला सहकार्य केले. गावातील प्रतिष्ठित नागरिक विलास ढवळे यांचेही मोहिमेसाठी सहकार्य लाभले. दरम्यान, तालुक्यातील इतर गावांतील नागरिकांनी १५ मे २०२६ पूर्वी स्वगणना प्रक्रिया पूर्ण करून डिजिटल मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन तहसीलदार प्रज्ञा काकडे यांनी केले आहे.

# हुंड्यासाठी छळ; पती व सासूकडून मारहाण

## जीवे मारण्याची धमकी !

प्रतिनिधी १० मे



**शेगाव:** लग्नात कमी हुंडा दिला, सोनं कमी दिलं, असे टोमणे मारून विवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ केल्याप्रकरणी पती व सासूविरुद्ध ७ मे रोजी शेगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माहेरून पाच लाख रुपये आणण्यासाठी जीवे मारण्याची धमकी दिल्याचा ही आरोप फिर्यादीने केला आहे. फिर्यादी पल्लवी राहुल दाणे (३४, रा. ज्ञानेश्वरीनगर, अकोट रोड, शेगाव) आरोपी राहुल काशिनाथ दाणे (३९) याच्याशी पुनर्विवाह झाला आहे. आरोपी उषा काशिनाथ दाणे (५७, सेवानिवृत्त) ही फिर्यादीची सासू असून दोघेही रा. शक्तीनगर, दुर्गापूर कॉलनी, चंद्रपूर येथील रहिवासी आहेत. दि. १३ जुलै ते २५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत नंगार गेशील गनन्या घडी सासू उषा दाणे या फिर्यादीला 'तुझ्या आई-वडिलांनी लग्नात खूप कमी साहित्य दिले, सोनं ही कमी दिलं, तुझ्यापेक्षा दुसरी असती तर जास्त हुंडा मिळाला असता,' असे म्हणत सतत टोमणे मारत असल्याचे तक्रारीत नमूद आहे. फिर्यादीने समजावून सांगण्याचा प्रयत्न केल्यास सासू पती राहुल दाणे याला भडकावत होती. त्यानंतर पतीने हात पिरगळणे, केस पकडून बेडरूममधून बाहेर ओढणे तसेच मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, मारहाणीमुळे एक्स-रे करण्यासाठी दवाखान्यात गेले असता धमकी देण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. माहेरून पाच लाख रुपये घेऊन ये, अन्यथा ठार मारू, अशी धमकी देत वेळोवेळी छळ करण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त १३ व १४ मे रोजी विविध कार्यक्रम

प्रतिनिधी १० मे

**मलकापूर:** धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त जन्मोत्सव सोहळा २०२६ चे आयोजन १४ मे रोजी करण्यात आले आहे.

धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या जयंती उत्सवा निमित्ताने जन्मोत्सव सोहळा लि. भो. चांडक विद्यालयामध्ये आयोजित करण्यात आला आहे. त्यानिमित्ताने १३ व १४ मे रोजी सकाळी १० ते रात्री ९ वा. पर्यंत छत्रपती महाराजांच्या पराक्रमाची संभाजी साक्ष देणाऱ्या शस्त्रांचे दुर्मिळ अद्वितीय दर्शन, ऐतिहासीक शिवकालीन शस्त्र प्रदर्शनी, परंपरा, शौर्य आणि इतिहासाचा जिवंत अनुभव देणारा एक अविस्मरणीय क्षण त्याचप्रमाणे पुणे येथील इतिहास अभ्यासक संतोष मुरलीधर चांदणे यांच्या संकल्पनेतून अनुभवता येणार आहे. त्याचप्रमाणे शिवव्याख्याते प्रा. यशवंत गोसावी यांचेही १४ मे रोजी सायंकाळी ७ वाजता व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन विदर्भाच्या प्रवेशद्वारी मलकापूर नगरीत प्रथमच गौरवशाली इतिहासाची साक्ष देणाऱ्या प्रदर्शनीला भेट दयावी व शिवरायांच्या या अतुलनीय आरमारी वैभवाला मानवंदना देण्यासाठी शिवप्रेमींनी व जनतेने परिवारासह सहभागी व्हावे, असे आवाहन समस्त शिवशंभू पाईक तथा छत्रपती संभाजी महाराज जेन्मोत्वव सोहळा २०२६ यांनी केले आहे.

# अकोला बायपासवर धावत्या कारला आग; वाहन खाक

## शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज

प्रतिनिधी १० मे

**खामगाव:** शहरातील अकोला बायपास मार्गावर धावत्या कारला अचानक आग लागल्याची घटना १० मे रोजी सायंकाळच्या सुमारास घडली. या घटनेत कार पूर्णतः जळून खाक झाली असून चालकाच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली.

मिळालेल्या माहितीनुसार, अकोला बायपास मार्गावरून जात असलेल्या एका कारमधून अचानक धूर निघू लागला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून चालकाने तत्काल वाइन रस्त्याच्या कडेला थांबतन बाहेर पडत स्वतःचा बचाव केला. काही क्षणांतच कारने पेट घेतला आणि आग वेगाने भडकत संपूर्ण वाहन आगीच्या भक्ष्यस्थानी सापडले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला; मात्र आगीची तीव्रता अधिक असल्याने त्यांना यश आले नाही. दरम्यान, खामगाव नगरपरिषद अग्निशमन घटनास्थळी दाखल झाला. अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ आग नियंत्रणात आणून पुढील अनर्थ टाळला. या आगीत कारचे मोठे नुकसान झाले असून वाहन पूर्णतः जळून खाक झाले. प्राथमिक माहितीनुसार, शॉर्टसर्किटमुळे विभाग आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असन पढील तपास सरू आहे.

# ४२ वर्षीय इसमाचा मृतदेह नदीपात्रात आढळला

प्रतिनिधी १० मे

**मलकापूर:** नरवेल येथील ४२ वर्षीय इसमाचा मृतदेह धुपेश्वर येथील पुर्णा नदीमध्ये आढळून आल्याने दिलेल्या फिर्यादीवरून दसरखेड एमआयडीसी पोलिसांनी मर्ग नोंदविला आहे. भास्कर काशीनाथ कोलते रा. नरवेल ता. मलकापूर यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, माझ्या भावाचा मुलगा स्वप्नील मोहन कोलते (वय ४२ वर्ष) रा. नरवेल ता. मलकापूर हा कोणालाही न सांगता ७ मे चे सकाळी ६ वा. ते ८ मे चे ८ वा. दरम्यान कोणाला काही न सांगता घरून मोटार सायकल घेवून निघून गेला होता. त्यानंतर त्याची पत्नी विद्या कोलते हिने मोबाईलवर फोन केला असता श्री क्षेत्र धुपेश्वर मंदिर जवळील पुलावरून जात असलेल्या हरी झाल्टे यांनी फोन वाजत असल्याचे सांगितले. त्यानंतर निलेश कोलते, अजित कोलते व इतर लोकांनी शोध घेतला असता ८ मे रोजी सकाळी ८ वा. सुमारास स्वप्नील कोलते याचा मृतदेह धुपेश्वर येथील पुर्णा नदीच्या पात्रात पुलाजवळ आढळून आला. त्यानंतर एमआयडीसी पोलिसांच्या व ग्रामस्थांच्या मदतीने उपजिल्हा रुग्णालय येथे त्याचा मृतदेह आणण्यात आला. त्याठिकाणी पोलिसांनी पंचनामा करून फिर्यादीवरून मर्ग क्र. ०८/२०२६ कलम १९४ बीनएसएस अन्वये दाखल केला आहे. पुढील तपास बिट हेकॉ राजेश बावणे हे करीत आहेत.

# लग्न वऱ्हाडींची मिनी बस उलटली; १० जण गंभीर जखमी

## ◆ चालक घटनास्थळावरुन पसार : गुन्हा दाखल

प्रतिनिधी १० मे




**जळगाव जामोद:** जळगाव जामोद तालुक्यातील सुनगावजवळ बऱ्हाणपूर रोडवर शुक्रवारी दुपारी लग्नातून परतणाऱ्या वऱ्हाड्यांनी भरलेली मिनी बस उलटून भीषण अपघात झाला. या अपघातात दीड वर्षाच्या बालकासह १० प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. अपघातानंतर बसचालक घटनास्थळावरून फरार झाला असून, त्याच्याविरुद्ध पोलिसांनी दि. ९ मे रोजी गुन्हा दाखल केला.

मध्य प्रदेशातील खेडी येथील रहिवासी संजय गणपतसिंग बरडे हे कुटुंबीयांसह निमखेडी येथे पुतण्याच्या लग्नासाठी आले होते. लग्न समारंभ आटोपून मिनी बसने परतत असताना सुनगावजवळील वळणावर समोरून येणाऱ्या दुचाकीला वाचविण्याच्या प्रयत्नात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. भरधाव मिनी बस (क्रमांक एमपी. ४६ टी ०९६३) रस्त्यावर उलटली. या अपघातात अक्षद मुकेश बरडे (१.५ वर्ष), ज्योती मुकेश बरडे (३४), कनाबाई रमेश बरडे (३५), मंगीता संजय बरडे (३५), रेखा मनोज बरडे (४०), कंदलीबाई शित्र्या वास्कले (५८), लक्ष्मण धुंदला भायड्या (५५), राजाराम बरडे (५४), गणपतसिंग बरडे (७०) आणि हरली टेटला वास्कले (७५) हे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर खामगाव व अकोल्यात उपचार सुरू आहेत. अपघातानंतर बसचालक जोगेंद्र शिवचंद राम (रा. उत्तर प्रदेश) हा जखमींना मदत न करता घटनास्थळावरून पसार झाला. याप्रकरणी जळगाव जामोद पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम १२५ (अ), १२५ (ब) आणि २८१ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार दीपक निकम करीत आहेत.

# मुलाचे लग्न अन् वडिलांचा अपघातात मृत्यू

प्रतिनिधी १० मे

**नांदुरा:** मुलाचे लग्न अवघ्या काही तासांवर असतानाच भरधाव वेगात जाणाऱ्या दुचाकीने दिलेल्या धडकेत वडिलांचा मृत्यू झाल्याची हृदय पिळवटून टाकणारी घटना ९ मे रोजी पहाटे पावणेसहा वाजेपुर्वी नांदुरा मलकापूर राष्ट्रीय महामार्गावरील कोलासर फाट्यावर घडली. पंढरी त्र्यंबक बगाडे वय ५३ रा. कोलासर असं मृत व्यक्तीच नाव आहे. या अपघातात दोघे दुचाकीस्वारही जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या दुखद घटनेमुळे वर-वधू कडील कुटुंबिय व नातेवाईकांनी विवाह सोहळा तुर्त थांबविला असल्याची माहिती मिळाली आहे.

याबाबत प्राप्त माहितीनुसार, तालुक्यातील कोलासर येथील पंढरी त्र्यंबक बगाडे यांच्या मुलाचा विवाह ९ मे रोजी दुपारी होणार असल्याने घरात आनंदाचे वातावरण पसरले होते. लग्न अवघ्या काही तासांवर येऊन ठेपल्याने घरात लगीन घाई सुरू? असतानाच पंढरी बगाडे यांना ९ मेच्या पहाटेच्या सुमारास राष्ट्रीय महामार्गावरील कोलासर फाट्यावर दुचाकी क्रमांक एम एच २८- बी. यु. ७६०५ या दुचाकीने धडक दिल्याने ते रोडवर पडले. यावेळी त्यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने या अपघातात घटनास्थळीच त्यांचा मृत्यू झाला. तर दोघे दुचाकीस्वारही जखमी झाले. घरात लग्नाची लगबग सुरू असतानाच अचानक झालेल्या या अपघातामुळे आनंदावर विरजण पडले. वडिलांच्या आकस्मिक मृत्यूची बातमी येताच मुलाला धक्का बसला. तसेच कुटुंबीयांवर शोककळा पसरली. अपघाताची माहिती मिळताच नांदुरा पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला.

या प्रकरणी मृतक पंढरी बगाडे यांचे चुलतभाऊ अर्जुन सुखदेव बगाडे यांनी दुचाकीस्वाराविरोधात नांदुरा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानंतर पोलिसांनी दुचाकी क्रमांक एम एच २८ बी. यु. ७६०५ चा चालक याच्या विरोधात कलम १०६ (१),२८१, १२५ (अ) १२५ (ब) ३२४(२) बीएन एस सहकलम १८४, १३४/१७७ मोवाका अन्वये गुन्ह्याची नोंद केली आहे. या प्रकरणाचा तपास पोहेकॉ शेख नवाज हे करीत आहेत.

# बोथा घाटात दुचाकी अपघातातील २ तरुणांचे कुजलेले मृतदेह आढळले


प्रतिनिधी १० मे

**खामगाव:** तालुक्यातील हिवरखेड पोलिस स्टेशन हद्दीतील बुलढाणा रोडवरील बोथा गावाजवळील घाटात दुचाकी अपघातातील दोन तरुणांचे मृतदेह आढळून आल्याची घटना ८ मे रोजी उघडकीस आली. मृतकांची ओळख पटली असून हे दोघे तीन दिवसापूर्वी बुलढाणा येथे गेले होते. तेथून परत येतांना दुचाकी दरीत कोसळून अपघात झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

याबाबत प्राप्त माहितीनुसार शुक्रवारच्या रात्री बोथा घाटात दुर्गंधी येत असल्याची माहिती हिवरखेड पोस्टेच्या पोलिसांना मिळाली. त्यावरुन एसडीपीओ प्रदीप पाटील, हिवरखेड पोस्टेचे प्रभारी ठाणेदार आशिष केचरे, बीट जमादार गजानन अहेर, पोकाँ महेंद्र नारखेडे व प्रदीप वानखडे हे घटनास्थळी दाखल झाले. यावेळी दुर्गंधी येत असलेल्या परिसराची पाहणी केली असता घाटातील दरीमध्ये दोघांचे मृतदेह पडलेले दिसले. तर मृतदेहांच्या बाजुला मोटरसायकल क्र. एम.एच. २७ बी.पी. ५६२० पडलेली होती. त्यानंतर ९ मे रोजी सकाळी मृतदेह दरीतून बाहेर काढण्यासाठी पोलिस व बोथा ग्रामस्थ घटनास्थळी पोहचले आणी मृतदेह बाहेर काढले. ग्रामस्थांकडून या दोघांची ओळख पटली असून मृतकांची नावे जयराम उर्फ सचिन सुरेश कांडेलकर वय ३० रा. बोथा व मुन्ना दादू जामुनकर वय ४५ रा. चिखलदरा जि. अमरावती अशी आहे आहे. दोघांचेही मृतदेह कुजलेले असल्याने जागेवरच शवविच्छेदन करण्यात आले आहे. पुढील तपास पोलिस करित आहेत.

# न्यायालयाच्या आदेशानंतर नगर परिषदेच्या १३८ गाळेधारकांना गाळे रिकामे करण्याच्या नोटीसेस

प्रतिनिधी १० मे



**मलकापूर:** न्यायालयाने दिलेल्या आदेशावरून नगर परिषदेच्या अखत्यारीत येत असलेल्या बुलढाणा रोडवरील व आठवडी बाजारातील शॉपींग कॉम्प्लेक्सच्या १३८ गाळे धारकांना गाळे खाली करून न. प. च्या ताब्यात देण्याच्या नोटीसेस मुख्याधिकारी संजय केदार यांनी बजावल्या आहेत. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून न्यायालयीन प्रक्रियेच्या माध्यमातून बेकायदेशीररित्या न. प. चे गाळे ताब्यात ठेवणाऱ्या गाळे धारकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

मलकापूर नगर परिषदेच्या मालकीच्या व हद्दीमधील शहरातील बुलढाणा रोडवरील शॉपींग कॉम्प्लेक्समधील वरील मजल्यावरील ३९ गाळे धारकांची मुदत संपल्याने नंतरही ते गाळे खाली न करता बेकायदेशीररित्या ताबा केला होता. ते खाली करण्यात यावे याकरीता माजी नगरसेवक देवेंद्र वानखेडे यांनी न्यायालयाच्या मा. उच्च नागपूर खंडपीठामध्ये जनहित याचिका क्र. ०४/२०१५ दाखल केली होती. यामध्ये ३९ गाळे धारक गैरअर्जदार होते. सुनावणी दरम्यान न. प. च्या वकीलांनी कायद्यातील तरतुदी प्रमाणे बॉम्बे गर्व्हमेंट प्रिमायसेस (इव्हिक्शन) अ?क्टनुसार न.प. प्रशासन गाळे खाली करून घेणार असे सांगितल्यामुळे विद्यमान उच्च न्यायालयाने आदेश पारीत करत दोन महिन्यांच्या आत याबाबत निर्णय घेण्याचे निवासी उपजिल्हाधिकारी बुलढाणा यांना ७ जून २०१६ रोजी आदेश दिले होते.

त्यानुसार निवासी उपजिल्हाधिकारी यांनी गाळे धारक, नगर पालिका व वानखेडे यांची बाजू ऐकून घेत सदर ताब्यात असलेले ३९ गाळे हे गाळे धारकांच्या ताब्यातून बेदखल करण्याचे आदेश पारीत केले होते.दरम्यानच्या काळात गाळे धारक यांनी जिल्हा व सत्र न्यायालय मलकापूर येथे अपिल दाखल करून गाळे खाली करण्याबाबत मनाई हुकूम घेतला होता. जिल्हा व सत्र न्यायालय मलकापूर येथे सुरू असलेल्या अपिल आम्हाला यापुढे चालवायचे नाही अशी भूमिका ३९ गाळे धारकांनी घेतल्यामुळे सदरचे अपिल क्र. ०९/२०१६ हे ९ फेब्रुवारी २०२६ रोजी न्यायालयाने निकाली काढले. त्यानंतर देवेंद्र वानखेडे यांनी मुख्याधिकारी यांना ३० एप्रिल २०२६ रोजी नोटीस पाठवून विद्यमान उच्च न्यायालयाचा अवमान करीत असल्यामुळे आपल्या विरूध्द अवमान याचिका दाखल करण्याबाबतचे लेखी पत्र दिले होते. त्यावरून मुख्याधिकारी यांनी ८ मे रोजी संबंधित गाळेधारकांना नोटीस बजावणे सुरू केले आहे. गाळे धारकांनी नोटीस मिळाल्यापासून ७दिवसाचे आत आपल्या ताब्यातील गाळे खाली करावे व थकीत दुकान भाडे तथा मालमत्ता कराचा संपूर्ण भरना करून स्वखर्चाने व कोणताही दावा न करता गाळे रिकामे करून न.प. च्या ताब्यात देण्यात यावे. अन्यथा गाळे धारकांविरूध्द जबरदस्तीची बेदखली कारवाई करण्यात येईल. तसेच न्यायालयाचा अवमान केल्याचे समजण्यात येवून त्या संबंधीचा सर्व खर्च गाळे धारकांकडून वसूल करण्यात येणार येईल, अशा नोटीसेस बजावण्यास सुरूवात केली आहे.

> न्यायालयाच्या निर्देशावरून न. प. च्या मालकीच्या असलेल्या बुलढाणा रोडवरील शॉपींग कॉम्प्लेक्समधील तळमजला व वरचा मजल्यावरील अशा एकूण ८० गाळे धारकांना नोटीसेस बजावण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. तर आठवडी बाजारातील एकूण ५८ गाळे धारकांनाही नोटीसेस बजावण्यात येणार आहेत. ७ दिवसाच्या आत गाळे खाली करून न.प. च्या ताब्यात देण्यात यावे. असे सक्त निर्देश नोटीसमध्ये देण्यात आले आहेत. हा अंतीम आदेश असणार असून त्यानंतर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.
>
> **- संजय केदार,**
> मुख्याधिकारी मलकापूर

# दगडफेक प्रकरणी सात आरोपी अटकेत; कारागृहात रवानगी

प्रतिनिधी १० मे

## ◆ शिवाजीनगर परिसरातील घटनेनंतर बंदोबस्त कायम

**खामगाव:** शहरातील शिवाजीनगर परिसरातील निर्मल टर्निंग भागात किरकोळ कारणावरून दोन गटांमध्ये झालेल्या दगडफेक प्रकरणी आतापर्यंत सात आरोपींना अटक करण्यात आली असून, न्यायालयाने ९ मे रोजी त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ७ मेच्या रात्री काही युवक रस्त्यावर क्रिकेट खेळत होते. त्याचवेळी लखन ऊर्फ शशांक पडोळे हे दुचाकीवरून तेथून जात असताना त्यांनी हॉर्न वाजवला. यावरून हॉर्न का वाजवला?' या कारणावरून खेळणाऱ्या युवकांमध्ये आणि पडोळे यांच्यात वाद झाला. त्यानंतर दोन्ही गटांमध्ये शाब्दिक चकमक होऊन शिवीगाळ, मारहाण तसेच दगडफेक झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी एकूण १६ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, पोलिसांनी ८ मे रोजी पाच आणि ९ मे रोजी आणखी दोन आरोपींना अटक केली. अटक करण्यात आलेल्या आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली. या प्रकरणातील इतर आरोपींचा शोध पोलिसांकडून सुरू असून, परिसरात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# मलकापुरात सासरच्या सात जणांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी १० मे

**मलकापूर:** मलकापूर भुसावळ येथील एका विवाहितेचा हुंड्यासाठी मानसिक व शारीरिक छळ केल्याप्रकरणी मलकापूर शहर पोलिसांनी ९ मे रोजी सासरच्या सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी जहिरा आफरीन आमिर सोहेल (वय २३, रा. खडका रोड, भुसावळ) यांनी मलकापूर शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, विवाहानंतर दुसऱ्याच दिवसापासून ११ मे २०२५ ते १६ मे २०२६ या कालावधीत तिचा मानसिक व शारीरिक छळ करण्यात आला. तसेच मेडिकल स्टोअर सुरू करण्यासाठी गानेऊन तीन लाख गागे भागानी मागणी करण्यात आली. पैशांसाठी वारंवार शिवीगाळ व मारहाण करण्यात आल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे. सततच्या त्रासाला कंटाळून संबंधित विवाहितेने पोलिसांत धाव घेत तक्रार नोंदविली. या प्रकरणी पोलिसांनी पती आमिर सोहेल शेख अब्दुल्ला कुरेशी, सासू सईदाबानो शेख अब्दुल्ला, जेठ शेख फारुख शेख अब्दुल्ला, नंदोई शकील अहमद कुरेशी, जेठाणी तसलीमबी शेख फालकू कुरेशी, नणंद सबा शकील अहमद कुरेशी आणि आसमा नियाज अहमद कुरेशी (सर्व रा. खडका, भुसावळ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
रविवार, दि. १० मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# नागपूर कृषी महाविद्यालयाच्या 22 विद्यार्थिनी महाराष्ट्र दिनी रात्रभर गेल्या कुठे ?

## कृषी विद्यापीठ प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह



◆ 'मुलींच्या सुरक्षेबाबत कोणी तडजोड केली आणि का केली. अशा प्रकारे नियमांना बगल देऊन विद्यार्थिनींना हॉस्टेल बाहेर पाठवणे गंभीर आहे. प्रशासनाने तात्काळ चौकशी समिती नेमून कारवाई करावी.' नाव गोपनीय ठेवण्याच्या अटीवर रोष व्यक्त करणारे पालक

**नागपूर / अकोला:** महाराष्ट्र दिनाच्या उत्सवाच्या वातावरणात नागपूरच्या शासकीय कृषी महाविद्यालयातून एक अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कृषी महाविद्यालयाच्या हॉस्टेलमध्ये राहणाऱ्या २२ विद्यार्थिनी १ मे रोजी चक्क महाविद्यालयाबाहेर खाजगी फार्म हाऊसवर रात्रभर वास्तव्यास होत्या अशी धक्कादायक माहिती मिळाली आहे.

या घटनेमुळे विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला असून महाविद्यालय प्रशासनात या गोष्टीने मोठी खळबळ उडाली आहे. या मुलींच्या पालकांकडून आम्ही मान्यता घेत त्यांना गेट टू गेदरसाठी पाठविले होते. त्या विषयीची परवानगी सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश कडू यांनी दिली होती. अशी माहिती वार्डन मेघा डहाळे यांनी सिटी न्यूज सुपरफास्ट सोबत मोबाईलवर बोलताना दिली. पण, या मुली कुठे गेल्या होत्या आणि का गेल्या होत्या. त्यांच्या सुरक्षेचे काय या विषयावर वार्डन यांनी कुठले ही मत व्यक्त केले नाही. मिळालेल्या माहितीनुसार, १ मे रोजी महाराष्ट्र दिनी २२ विद्यार्थिनी नागपूर शहराबाहेरील एका प्राध्यापकाच्या फार्म हाऊसवर गेल्या होत्या. धक्कादायक बाब म्हणजे, या विद्यार्थिनी रात्रभर तिथेच थांबल्या. नियमानुसार, हॉस्टेलमधील विद्यार्थिनींना बाहेर राहायचे असल्यास लेखी परवानगी, पालकांची संमती आणि रीतसर नोंद असणे अनिवार्य असते. मात्र, या प्रकरणात अशा कोणत्याही नियमांचे पालन झाले नसल्याचे समजते. पण, हॉस्टेल च्या वार्डन मेघा डहाळे यांनी या विषयी त्यांच्याकडे सर्व परवानग्या असल्याचा दावा केला आहे. पण, त्यांनी त्या दाव्याविषयीचे कुठले ही कागदपत्र दिले नाही या मुलींसोबत एक महिला कर्मचारी देखील गेल्याचा दावा वार्डन मेघा डहाळे यांनी केला आहे.

या प्रकरणाची चर्चा विद्यापीठ परिसरात वाऱ्यासारखी पसरली आहे. डॉ. प्रकाश कडू यांनी या मुलींना जाण्यासाठी 'तोंडी' परवानगी दिल्याचा दावा केला जात आहे. तर दूसरीकडे वार्डन मेघा डहाळे यांनी त्यांच्याकडे लेखी परवानगी असल्याचे म्हटले आहे. जबाबदार पदावर असलेल्या व्यक्तीने कुठल्या आधारावर मुलींना रात्री बाहेर पाठविले. त्यांच्या सुरक्षेची आवश्यक ती काळजी सर्व प्रकरणात घेतल्या गेली होती काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. या घटनेमुळे हॉस्टेलची सुरक्षा व्यवस्था आणि वार्डन यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. हॉस्टेलच्या नोंद वहित मुली महाराष्ट्र दिनी सायंकाळी ६.३० वा रात्री हॉस्टेल बाहेर निघाल्या आणि त्या २ मे रोजी सकाळी ११वा. परत आल्या. अशी नोंदच वसतीगृहाच्या गेटवरील गार्डने घेतली आहे. या सर्व मुलींच्या पालकांना याची पालकांना कल्पना होती का ? मुलींच्या या रात्रभराच्या वास्तव्याबद्दल त्यांच्या पालकांना प्रशासनाकडून कळवण्यात आले होते का ?. ज्या ठिकाणी या मुली रात्रभर गेल्या त्या ठिकाणी काय सुरक्षितता होती याची खातरजमा कशा प्रकारे केल्या गेली अशी विचारणा होत आहे. शैक्षणिक संस्थेत अशा प्रकारची बेजबाबदार वृत्ती खपवून का घेतली जात आहे. संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून, हॉस्टेल वार्डन आणि दोषी प्राध्यापकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.आता महाविद्यालय प्रशासन यावर काय भूमिका घेते आणि दोषींवर काय कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या विषयावर नागपूर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.प्रकाश कडू यांच्याशी वारंवार संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. तर कृषी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी किशोर बिडवे यांना या विषयी विचारणा केली असता त्यांनी चौकशी करुन सांगतो असे स्पष्ट केले.

# लोकप्रतिनिधींनी दिलेली आश्वासने हवेत विरली



◆ नगर पंचायत निवडणुकीनंतर देखील समस्या कायम

प्रतिनिधी १० मे

**बार्शीटाकळी :** नगरपंचायतची निवडणूक होऊन चार ते पाच महिने झाले. परंतु नगरसेवक व नगराध्यक्षांनी लोकांना दिलेले आश्वासन पाळलेले दिसत नाही. निवडून आल्यानंतर रस्ते, नाले दुरूस्ती पिण्याकरिता पाणी देऊ असे बोलले होते. परंतु प्रत्यक्षात काहीही झाले नाही. उलट शहर समस्या गंभीर बनत आहेत.

अजून पावसाळा सुरू झाला नाही. मात्र काल रात्री झालेल्या पावसाने शहर स्वच्छतेची लक्तरे निघाली. बार्शीटाकळी च्या मेन बाजार लाईन मध्ये ठिकठिकाणी पाणी साचले. तुंबलेल्या नाल्यातील पाणी रस्त्यावर येत आहे. घाण पाण्यातून लोकांना येणे जाणे करावे लागत आहे. भोईपुरा, बाजार लाईन हे बार्शीटाकळी मधील दोन मेन रोड असून या रोडवर अशी घाण पडलेली आहे तर आतील गल्ल्यांमध्ये काय हाल होत असतील विचारू नका. बार्शीटाकळीच्या १७ वार्ड असून यामध्ये एकही नगरसेवक चांगले काम करत नाही अशी ओरड आहे. नगरसेवक फक्त पद घेऊन फिरत आहेत. पाच महिने झाल्यावर एकाही नगरसेवकाने रस्ते, नाल्या याकडे लक्ष दिले नाही. येथील लोक नगरपंचायत मधील अधिकारी, कर्मचारी व नगरसेवक यांच्यावर नाराजी व्यक्त करीत आहे. निवडणूकी दरम्यान दिलेले आश्वासन पाळण्यात नगरसेवक अपयशी ठरले असा ठपका ठेवला जातो आहे.

# अकोटमध्ये वीज कोसळून गाय व म्हैस दगावली



**अकोट :** शहरात शनिवारी पहाटे अवकाळी पावसासह विजांचा कडकडाट झाला. या नैसर्गिक आपत्तीत येथील गुजर प्लॉट परिसरातील एका गोठ्यावर वीज कोसळून एक गाय व एक म्हैस जागीच मृत्यूमुखी पडल्याची दुर्दैवी घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, गुजर प्लॉट परिसरात राहणारे पशुपालक विठ्ठल बेराड यांच्या गोठ्यात ही घटना घडली. ९ मे रोजी पहाटे अंदाजे ३ वाजताच्या सुमारास जोरदार विजांच्या कडकडाटासह पाऊस सुरू असताना अचानक गोठ्यावर वीज कोसळली. या घटनेत गोठ्यात बांधलेल्या एका गायीचा व एका म्हशीचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेमुळे विठ्ठल बेराड यांचे अंदाजे एक ते दीड लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून अहवाल तहसीलदारांकडे सादर करण्यात आला आहे. अचानक झालेल्या या घटनेमुळे पशुपालक विठ्ठल बेराड यांच्यावर आर्थिक संकट ओढवले असून शासनाने तातडीने मदत द्यावी, अशी मागणी आहे.

# लोकन्यायालयात २ हजार ८७२ प्रकरणे निकाली

## ९ कोटी ३७ लाख ७८ हजार ५३० रुपयांची तडजोड

प्रतिनिधी १० मे

**अकोला :** राष्ट्रीय,राज्य विधी सेवा प्राधिकरण यांचे निर्देशानुसार अकोला जिल्हयातील सर्व दिवाणी व फौजदारी न्यायालये तसेच कामगार न्यायालय, सहकार न्यायालय, कौटुंबीक न्यायालय, औद्योगिक न्यायालय व जिल्हा ग्राहक तक्रार आयोग येथे राष्ट्रीय लोक न्यायालयाचे आयोजन करण्यात आले.अकोला जिल्ह्यातील सर्व न्यायालयात ११ हजार ३९८ प्रकरणे राष्ट्रीय लोक न्यायालयात तडजोडीकरीता ठेवण्यात आली होती. त्यापैकी एकुण १ हजार ३५८ अशी एकूण प्रलंबित प्रकरणात व एकुण १ हजार ५१८ दाखलपुर्व प्रकरणात समेट घडुन आला. २ हजार ८७२ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामध्ये मुख्यत्वे दिवाणी, फौजदारी, वैवाहीक वाद स्वरूपाची तसेच मोटार वाहन अपघात प्रकरण व कलम १३८ एन.आय. ॲक्ट आणि पंचायतचे घरपट्टी/पाणीपट्टी बँकांची खटलापूर प्रकरणात तडजोड होउन रक्कम रूपये ९ कोटी ३७ लाख ७८ हजार ५३० रूपयेची तडजोड झाली. आपसी सहमतीने घटस्फोट घेणारे पती-पत्नी चे ३ जोडपे नांदण्याकरिता गेले. त्यामध्ये महत्वाची बाब म्हणजे एका प्रकरणामध्ये पती पत्नी मध्ये असलेल्या वादाबाबत मागील अनेक वर्षापासून प्रकरणे प्रलंबित होती ती प्रकरणे लोकन्यायालयाच्या माध्यमातून निकाली निघाली. तसेच मॅक्टचे प्रकरणे देखील गोठ्या प्रगाणात निकाली निघाली. लोकन्यायालयाच्या माध्यमातुन अनेक प्रकरणे समोपचाराने मिटवली जात आहेत हा समाजाला एक खुप मोठा चांगला संदेश जात आहे. लोक न्यायालय यशस्वी होणेकरीता ए. डी. क्षीरसागर, प्रभारी अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, तसेच दि. शं. दाभाडे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला यांचे मार्गदर्शन लाभले.

# जिल्हास्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन

प्रतिनिधी १० मे

**अकोला :** पंचायत विभाग, जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्हास्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आदर्श ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.


पुरस्कार वितरण सोहळा सोमवार, ११ मे रोजी दुपारी ३ वाजता संविधान सभागृह, सिव्हील लाईन चौक, अकोला येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अनिता मेश्राम राहणार असून त्यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. तसेच अति. मुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे आणि उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग रविकांत पवार यांची प्रमुख उपस्थिती राहील. कार्यक्रमास जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. तसेच कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन सहाय्यक गटविकास अधिकारी हरिनारायणसिंह परिहार यांनी केले आहे.

# शौचालय बांधकामाच्या वादातून कुटुंबावर प्राणघातक हल्ला, सिरसो येथील घटना

प्रतिनिधी १० मे

**मूर्तिजापूर :** शासनाने मंजूर केलेल्या शौचालय बांधकामाच्या कारणावरून झालेल्या जुन्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. सिरसो येथे राहणाऱ्या एका तरुणीसह तिच्या कुटुंबाला अश्लील शिवीगाळ करून वीटांनी मारहाण करण्यात आली. या प्रकरणी मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांनी दोन आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी नेहा विजय वानखडे (वय २२) हिच्या घरी शासनाने मंजूर केलेले संडास बांधकाम सुरू आहे. या बांधकामावरून आरोपी नितीन वानखडे आणि त्याच्यासोबत राहणारी महिला नेहमी वाद घालत असत. ८ मे रोजी रात्री ११:३० वाजेच्या सुमारास हा वाद विकोपाला गेला. आरोपींनी नेहा वानखडे, तिचे वडील, भाऊ, बहीण आणि आजी यांना उद्देशून अत्यंत अश्लील भाषेत शिवीगाळ केली. एवढ्यावरच न थांबता, 'तुम्हाला जिवंत मारून टाकू' अशी धमकी देत घरासमोर पडलेली रेती, गिट्टी आणि विटांनी कुटुंबावर हल्ला केला. या हल्ल्यात फिर्यादी नेहा हिच्या डाव्या पायाच्या घोट्याजवळ वीट लागल्याने ती गंभीर जखमी झाली. तसेच आरोपींनी कुटुंबातील सदस्यांना थापडा-बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. घटनेनंतर जखमी नेहा वानखडे हिने दिलेल्या तक्रारीवरून आणि वैद्यकीय अहवालावरून मूर्तीजापूर ग्रामीण पोलिसांनी आरोपी नितीन वानखडे व त्याच्यासोबत राहणारी महिला यांच्या विरुद्ध अपराध क्रमांक २२०/२६ कलम २९६, १२५(अ), ३(५) बीएनएस (BNS) नुसार गुन्हा दाखल केला आहे.या प्रकरणाचा तपास मूर्तीजापूर ग्रामीण पोलीस स्टेशन ठाणेदार श्रीधर गुट्टे यांच्या नेतृत्वात एएसआय संजय खंडारे करत आहेत.




# लग्न समारंभात स्कूटीमधून २० हजारांची रोकड चोरी

◆ शुभम मंगल कार्यालयात सीसीटी कॅमेरे बसवण्याची मागणी

प्रतिनिधी १० मे

**अकोला :** शुभ मंगल कार्यालय गोरक्षण रोड येथे लग्नसमारंभा दरम्यान स्कूटी मधून २० हजार रुपयांची चोरी झाली. याप्रकरणी खदान पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. या अगोदर सुद्धा त्या कार्यालयाच्या आवारा मधून मोटरसायकली चोरीला गेलेल्या आहे.

शुभमंगल कार्यालय प्रशासनाकडे सीसीटी कॅमेरे बसवण्याची मागणी आहे. प्राप्त माहितीनुसार, कृष्णा देनिवास लहाने (वय ४९, रा. कोठारी वाटीका, मलकापूर, अकोला हे खाजगी नोकरी करतात. त्यांच्या शेजारी राहणाऱ्या उपाध्ये यांच्या मुलीच्या विवाह समारंभासाठी ते पत्नीसमवेत शुभम मंगल कार्यालय येथे गेले होते.

यावेळी त्यांनी त्यांच्या पांढऱ्या रंगाच्या स्कूटी क्रमांक MH-३०-AX-०२०४ मध्ये मुलीच्या सुकन्या योजनेसाठी भरणा करावयाची २० हजार रुपयांची रोकड ठेवली होती. लग्नसमारंभ आटोपल्यानंतर त्यांनी गाडी तपासली असता स्कूटीमध्ये ठेवलेली रोकड अज्ञात चोरट्याने लंपास केल्याचे निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच खदान पोलिसांनी तक्रार नोंदवून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724 - 2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK